सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## २०२४-२०२५

### अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, नागपूर

२०२४

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## २०२४-२०२५

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

# अनुक्रमणिका


| परिच्छेद क्रमांक | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रास्ताविक ... ... ... ... ... | १ |
| २. | कार्यक्रम क्रमांक १ : सचिवालय आर्थिक सेवा ... ... ... ... | १ |
| ३. | कार्यक्रम क्रमांक २ : प्रापण, साठवणूक व वितरण व ग्राहक संरक्षण ... ... ... | १ |
| ३.१ | किमान आधारभूत किंमत खरेदी योजना... ... ... ... ... | १ |
| ३.१.१ | ज्वारी, बाजरी, भात व मका यांचे सर्वसाधारण गुणवत्ता व दर्जा ... ... ... | २ |
| ३.१.२ | आधारभूत किंमतीनुसार धान्य खरेदी ... ... ... ... | २ |
| ३.२ | सार्वजनिक वितरण व्यवस्था ... ... ... ... ... | २ |
| ३.२.१ | लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्था ... ... ... ... | ३ |
| ३.३ | तांदूळ व गहू (नियतन, उचल व वाटप) ... ... ... ... | ५ |
| ३.३.१ | राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ ची अंमलबजावणी ... ... ... | ५ |
| ३.३.२ | मराठवाडा व विदर्भातील १४ जिल्ह्यांतील सर्व शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या धर्तीवर अन्नधान्याचा लाभ देण्याबाबत | ७ |
| ३.३.३ | केंद्रीय अन्नपुर्णा योजना ... ... ... ... ... | ८ |
| ३.३.४ | कल्याणकारी संस्थांना धान्य वाटप ... ... ... ... | ८ |
| ३.४.१ | अन्नधान्याची साठवणूक ... ... ... ... ... | ९ |
| ३.४.२ | जिल्हानिहाय शासकीय गोदाम क्षमता ... ... ... ... | ९ |
| ३.५ | सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्नधान्य वितरणाची सुधारित पद्धत ... ... ... | १० |
| ३.६ | शिधावाटप दुकाने ... ... ... ... ... | १० |
| ३.६.१ | राज्यातील रास्तभाव दुकाने व किरकोळ केरोसिन परवाने स्वयंसहायता गटांना देण्याचा निर्णय ... ... | ११ |
| ३.७ | दक्षता समित्या ... ... ... ... ... | ११ |
| ३.८ | साखर, रॉकेल, पेट्रोल-डिझेल, इ. नियंत्रित वस्तूंचे वितरण ... ... ... | ११ |
| ३.८.१ | (अ) साखर ... ... ... ... ... | ११ |
| ३.९ | (ब) रॉकेल ... ... ... ... ... | १२ |
| ३.१० | (क) पेट्रोलजन्य पदार्थ ... ... ... ... ... | १३ |
| ३.११ | सार्वजनिक वितरण व्यवस्था बळकट होण्याकरिता करण्यात आलेल्या उपाययोजना ... ... | १३ |
| ३.११.१ | गुन्ह्याची माहिती ... ... ... ... ... | १३ |
| ३.११.२ | शिवभोजन योजना ... ... ... ... ... | १४ |
| ३.१२ | भात गिरणी उद्योग ... ... ... ... ... | १८ |
| ३.१३ | ग्राहक संरक्षण ... ... ... ... ... | १८ |
| ३.१३.१ | राज्य ग्राहक संरक्षण परिषद ... ... ... ... ... | १८ |
| ३.१३.२ | जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद ... ... ... ... ... | १८ |
| ३.१३.३ | राज्य ग्राहक हेल्पलाईन ... ... ... ... ... | १८ |
| ४. | कार्यक्रम क्रमांक–३ : वैधमापनशास्त्र यंत्रणा व विनियमन ... ... ... | १८ |
| ५. | कार्यक्रम क्रमांक–४ : महा लेखापालांच्या लेखापरीक्षा अहवालाची सद्यःस्थिती व लोकलेखा समितीच्या शिफारस अहवालावरील अभिप्राय | २१ |
| | परिशिष्ट “अ” : २०२१-२०२२ च्या एकूण अर्थसंकल्पाच्या कार्यक्रमाप्रमाणे तपशील व मुख्य लेखाशीर्षातील उद्दिष्टवार वर्गीकरणानुसार वित्तीय आवश्यकतेचा तक्ता. | २२ |
| | परिशिष्ट “ब” : कर्मचारीविषयक गोषवारा व कार्यक्रमानुसार कर्मचाऱ्यांचे वेतनमान व पदसंख्या दर्शविणारा तक्ता... | ३८ |
| | परिशिष्ट “क” : अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागातर्फे अंमलबजावणी करण्यात येणारे आदेश/अधिनियम यांची सूची | ५० |
| | परिशिष्ट “ई” : शिधापत्रिकांची संख्या व अधिकृत शिधावाटप/रास्त भाव दुकानांची माहिती दर्शविणारा तक्ता ... | ५४ |
| | परिशिष्ट “फ” : वैधमापनशास्त्र यंत्रणेच्या कामाचा आढावा व वजने, मापे पडताळणी व मुद्रांकन कामाचा तपशील | ५५ |
| | परिशिष्ट “ग” : मानक, वजने व मापे व आवेष्टित वस्तू अधिनियमाखाली भरण्यात आलेल्या खटल्यांबाबतचा तक्ता | ५६ |
| | परिशिष्ट “ह” : वैधमापनशास्त्र यंत्रणेमार्फत मागील तीन वर्षात देण्यात आलेले नवीन व नुतनीकरण करण्यात आलेले परवाने, इ. दर्शविणारा तक्ता. | ५७ |

## प्रास्ताविक

१.१ कृषी, अन्न व सहकार विभागातून पुरवठा विभाग स्वतंत्र करून मार्च, १९६५ मध्ये अन्न व नागरी पुरवठा विभागाची निर्मिती करण्यात आली. सन १९६६ मध्ये शासनाने रास्तभाव दुकानाच्या सहाय्याने मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रात सांविधानिक शिधावाटप योजना सुरू केली. राज्यात रास्तभाव दुकानामार्फत अन्नधान्याचे वाजवी भावाने वाटप होईल अशी सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. डिसेंबर १९७७ साली उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभागातून वजने व मापे यांचे व्यवस्थापन काढून घेऊन ते नागरी पुरवठा विभागाच्या नियंत्रणाखाली आणण्यात आले. या विभागाच्या कार्याचे खालीलप्रमाणे प्रवर्गीकरण करता येईल–

कार्यक्रम–१ : सचिवालय आर्थिक सेवा.

कार्यक्रम–२ : प्रापण, साठवणूक आणि वितरण व ग्राहक संरक्षण.

कार्यक्रम–३ : वजने व मापे यांचे विनियमन.

१.२ अन्न, व नागरी पुरवठा विभागाच्या विविध शाखांच्या कार्याची रुपरेषा कार्यक्रम १, २ आणि ३ खाली दर्शविण्यात आली आहे. मुख्य लेखाशीर्षानुरुप तसेच कार्यक्रमानुरुप वित्तीय आवश्यकतेचा तपशील परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आला आहे. तसेच कर्मचारी विषयक गोषवारा आणि कर्मचाऱ्यांचे वेतनमान दर्शविणारे तक्ते परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आले आहेत.

### २. कार्यक्रम क्रमांक १ : सचिवालय आर्थिक सेवा–

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग (खुद्द) च्या कार्याची रुपरेषा खालीलप्रमाणे आहे.

२.१ सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत भारतीय अन्न महामंडळाकडून अन्नधान्य (तांदूळ व गहू) खरेदी करण्याचे धोरण ठरविणे, केंद्र शासनाच्या नियत वाटपाप्रमाणे केंद्र व्यापार महामंडळ/(STC) यांचेकडून तेल स्वीकारणे, त्यांच्या साठवणुकीची व वितरणाची व्यवस्था करणे तसेच आधारभूत किंमतीच्या आधारे स्थानिक खुल्या बाजारात ज्वारीसह धान्य खरेदीचे धोरण ठरविणे आणि केंद्र शासनाच्या विकेंद्रीत योजनेंतर्गत अन्नधान्य वितरीत करणे.

२.२ साखर, रॉकेल इ. सारख्या नियंत्रित वस्तूंच्या पुरवठ्यावर संनियंत्रण ठेवणे आणि पामतेल, तुरडाळ इ. सारख्या जीवनावश्यक वस्तू सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत रास्त भाव दराने उपलब्ध होतील अशी व्यवस्था करणे.

२.३ वस्तूंच्या किंमतीबाबतच्या स्थितीवर सर्वसाधारण लक्ष पुरविणे.

२.४ जीवनावश्यक वस्तू कायद्याखाली विविध आदेश प्रस्तुत करणे व त्यावर संनियंत्रण ठेवणे आणि आवश्यक तो परिणाम साध्य करण्याकरिता आवश्यकतेप्रमाणे सदर आदेशांमध्ये दुरुस्त्या करणे. या आदेशांची सूची परिशिष्ट "क" म्हणून जोडण्यात आलेली आहे.

२.५ सर्वसाधारणपणे राज्यातील ग्राहक, शेतकरी तसेच शेतमालावर आधारित उद्योगधंदे (विशेषतः अन्नधान्य, तेल व साखर इत्यादी) यांच्या हिताच्या दृष्टीने धोरण ठरविणे.

२.६ वजने व मापे यांच्या संबंधाने करण्यात आलेल्या कायद्याच्या आणि नियमांच्या अंमलबजावणीवर संनियंत्रण ठेवणे.

२.७ या विभागाच्या प्रशासनिक कक्षेत खालीलप्रमाणे उपविभाग काम करतात–

(१) कार्यकारी सचिव, ग्राहक संरक्षण परिषद, राज्य आयोग व जिल्हा मंच यांची कार्यालये.

(२) वित्तीय सल्लागार व उपसचिव यांचे कार्यालय.

(३) पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई.

(४) संचालक, नागरी पुरवठा (गोदाम आणि वाहतूक), मुंबई.

(५) नियंत्रक शिधा वाटप कार्यालय, मुंबई.

(६) विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांचे पातळीवरील जिल्हा पुरवठा कार्यालये.

(७) राज्य अन्न आयोग, मुंबई.

(८) नियंत्रक, वैधमापनशास्त्र, मुंबई यांचे अधिपत्याखालील विभागीय व जिल्हा कार्यालये.

### ३. कार्यक्रम क्रमांक २ : प्रापण, साठवणूक व वितरण व ग्राहक संरक्षण–

या कार्यक्रमासाठी कार्यवाही करण्याच्या उद्देशाने राज्याचे खालीलप्रमाणे दोन विभाग करण्यात आलेले आहेत :–

(१) मुंबई महानगरपालिका व ठाणे महानगरपालिकेतील शहरी विभाग आणि कल्याण, भिवंडी, डोंबिवली, उल्हासनगर व अंबरनाथ हे शहरी विभाग मिळून मुंबई व ठाणे शिधावाटप क्षेत्र.

(२) ठाणे जिल्ह्यातील वर नमूद केलेले विभाग वगळता उर्वरित ठाणे जिल्ह्यासह इतर जिल्ह्यांचा महसुली विभाग.

**३.१ किमान आधारभूत किंमत खरेदी योजना :** किमान आधारभूत किंमत खरेदी योजना ही केंद्र शासनाची योजना आहे. सदर योजनेची अंमलबजावणी भारतीय अन्न महामंडळाच्यावतीने राज्य शासनाकडून करण्यात येते. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी हमी भाव मिळावा, हा योजनेचा प्रमुख उद्देश आहे. सदर योजनेंतर्गत धान/भरडधान्याची खरेदी संपूर्ण राज्यामध्ये बिगर आदिवासी भागात मार्केटिंग फेडरेशनमार्फत तर आदिवासी भागातील खरेदी आदिवासी विकास महामंडळाकडून करण्यात येते. खरेदी केलेल्या धानाची भरडाई अभिकर्ता संस्था, करारनामा केलेल्या मिलर्सकडून करून घेतात व प्राप्त सी.एम.आर. (तांदूळ) हंगाम २०१५-१६ पर्यंत भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करण्यात येत होता. खरीप व रब्बी हंगाम २०१६-१७ पासून "विकेंद्रीत धान खरेदी योजना" संपूर्ण राज्यात राबविण्याचा निर्णय शासनाने दिनांक १४-१-२०१६ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. त्यानुसार सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर योजनेतंर्गत धानाची खरेदी प्रचलित पध्दतीनुसार दोन्ही अभिकर्ता संस्थाकडून करण्यात येत आहे. सदर अभिकर्ता संस्थाकडून खरेदी केलेला धान आता मिलर्सकडून भरडाई झालेला सीएमआर (तांदूळ) भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करण्याऐवजी तो संबंधीत गिरणी मालकामार्फत शासकीय गोदामात जमा करण्यात येत आहे. या संपूर्ण प्रक्रियेवरील संनियंत्रणाची जबाबदारी जिल्हा पुरवठा यंत्रणेची असते. या योजनेकरिता लागणारा भांडवली खर्च विभागाच्या स्वीय प्रपत्री लेख्यातून (PLA) भागविण्यात येतो.

हंगाम २०१९-२० मधील धान/भरडधान्य खरेदीबाबतचा निर्णय दिनांक ९ सप्टेंबर २०१९ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

**३.१.१** हंगाम २०१९-२० करिता धान/भरडधान्य खरेदीकरिता केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत किंमती.

**सर्वसाधारण गुणवत्ता व दर्जा**

| पीक | | आधारभूत किंमत (रुपये प्रति क्विंटल) | शेतकऱ्यांना प्रत्यक्ष द्यावयाचा दर (रुपये प्रति क्विंटल) |
|---|---|---|---|
| धान/भात (एफ.ए.क्यू.) | अ) साधारण | १,८१५ | १,८१५ |
| | ब) "अ" दर्जा | १,८३५ | १,८३५ |
| भरड धान्य (एफ.ए.क्यू.) | ज्वारी (संकरीत) | २,५५० | २,५५० |
| | ज्वारी (मालदांडी) | २,५७० | २,५७० |
| | बाजरी | २,००० | २,००० |
| | मका | १,७६० | १,७६० |
| | रागी | ३,१५० | ३,१५० |

**३.१.२** किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गतच्या मागील तीन वर्षातील धान्य/भरडधान्य खरेदीची स्थिती खाली दिलेल्या तक्त्यामध्ये दर्शविण्यात आली आहे.

(आकडे मे. टनात)

| वर्ष | धान्याचा प्रकार | अंदाजित खरेदी | प्रत्यक्ष झालेली खरेदी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| (१) २०१७-२०१८ ... | ज्वारी ... | १,५०,००० | २,२५६.१११ |
| | बाजरी ... | २,००० | ... |
| | मका ... | १०,००० | ४७,९०८.१८५ |
| | गहू ... | ... | ... |
| | भात ... | ४,६०,००० | २,५१,०६७.६३१ |
| (२) २०१८-२०१९ ... | ज्वारी ... | ५०,००,००० | १,०९,६३३.११ |
| | बाजरी ... | ५,०००,००० | ... |
| | मका ... | ५,००,००० | ६९,८७२.३८ |
| | गहू ... | ... | ... |
| | भात ... | ९,००,००० | ८,६५,६६८.०५ |
| (३) २०१९-२०२० ... | ज्वारी ... | ५,००० | ८१३.५० (दि. ३०-१२.२०१९ अखेर) |
| | बाजरी ... | २,३५० | ... |
| | मका ... | ४०,००० | १९.१० (दि. ३०-१२.२०१९ अखेर) |
| | गहू ... | ...... | ... |
| | भात ... | ९,००,००० | २,९२,९८१.०० (दि. ३०-१२.२०१९ अखेर) |
| | रागी ... | ७५० | ... |

**३.१.३** सन २०१७-१८ मध्ये आधारभूत किंमत योजनेअंतर्गत खरेदी बाबतचा शासन निर्णय क्रमांक खरेदी-१०१७/प्र.क्र. १४०/ना.पु. २९, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१७ मधील परिच्छेद १२ अ नुसार आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत खरेदी करण्यात येणाऱ्या धान/भरड धान्याच्या (ज्वारी, बाजरी व मका) नियमित अहवाल केंद्र शासन/भारतीय अन्न महामंडळास पाठविण्यासाठी मा. वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालयाच्या नियंत्रणाखाली कंट्रोल रूमची स्थापना करण्यात आली असल्याने या कार्यालयाकडून सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकासाठी माहिती उपलब्ध करून देता येणार नाही.

**३.२ सार्वजनिक वितरण व्यवस्था :** सार्वजनिक वितरण व्यवस्था ही केंद्र शासनाची योजना असून तिच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी राज्य शासनावर आहे. महाराष्ट्रात ही योजना गेली सुमारे चार दशके सुरु आहे. मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात दिनांक २३-११-१९६६ च्या व राज्यातील इतर भागात दिनांक २६-९-१९७५ च्या सांविधिक आदेशाद्वारे सार्वजनिक वितरण व्यवस्था अंमलात आली.

**३.२.१ लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्था :–**

केंद्र शासनाच्या किमान सामायिक कार्यक्रमांतर्गत गरीबांना केंद्रस्थानी मानून दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना सवलतीच्या दराने अन्नधान्य पुरविण्याची योजना राज्यात दिनांक १ जून, १९९७ पासून सुरु करण्यात आली. या योजनेंतर्गत सुरुवातीला गरीब कुटुंबांना प्रति कुटुंब दरमहा १० किलो अन्नधान्य प्रचलित दराच्या अर्ध्या किंमतीत उपलब्ध करून दिले जात होते. नंतर धान्याच्या प्रमाणामध्ये दिनांक १ एप्रिल, २००० पासून वाढ करून प्रति कुटुंब दरमहा २० किलो अन्नधान्य उपलब्ध करून दिले जात होते. त्यानंतर दि. १ एप्रिल, २००२ पासून दारिद्र्यरेषेखालील म्हणजे पिवळ्या शिधापत्रिकाधारकांना दरमहा ३५ किलो धान्य (गहू व तांदूळ) व केशरी शिधापत्रिकाधारकांना प्रतिमाह १५ किलो धान्य (तांदूळ व गहू) देण्यात येत होते.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत राज्यासाठी सुरुवातीस केंद्र शासनाने ६०.३४ लक्ष एवढी बीपीएल लाभार्थ्यांची कुटुंब संख्या (इष्टांक) निश्चित केली होती. त्यानंतर सन २००० च्या राज्याच्या लोकसंख्येवर आधारित राज्याकरिता पूर्वीच्या इष्टांकात वाढ करून ६५.३४ लक्ष एवढी दारिद्र्यरेषेखालील लाभार्थ्यांची कुटुंब संख्या (इष्टांक) निश्चित केली आहे.

दिनांक १ फेब्रुवारी, २०१४ पासून राज्यात राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायद्याची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. त्यानुसार लाभार्थ्यांचे अंत्योदय गट व प्राधान्य गट असे दोन गट अस्तित्वात आले असून अंत्योदय गटाच्या लाभार्थ्यांस पूर्वीप्रमाणेच प्रतिमाह प्रतिशिधापत्रिका ३५ किलो अन्नधान्याचे वाटप करण्यात येते, तर प्राधान्य गटाच्या लाभार्थ्यास प्रतिमाह प्रतिव्यक्ती ५ किलो अन्नधान्याचे वाटप करण्यात येते.

**लाभार्थ्यांसाठी निकष :–**

केंद्र शासनाने राज्यातील बी. पी. एल. कुटुंबांच्या संख्येत केलेली वाढ विचारात घेऊन, राज्य शासनाने आयआरडीपीच्या १९९७-१९९८ च्या यादीत नाव समाविष्ट असलेल्या व रुपये १५,००० किंवा त्यापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबांना पिवळ्या शिधापत्रिका देण्याचा निर्णय घेतला. या निकषांच्या आधारे पिवळ्या शिधापत्रिका मिळण्यास पात्र असलेली सर्व कुटुंबे या योजनेचे लाभधारक असतील.

**तिहेरी शिधापत्रिका योजना :–**

सर्वसाधारणतः सधन कुटुंबातील व्यक्ती शिधावाटप दुकानामधील धान्य घेत नाहीत. त्यामुळे जी कुटुंबे धान्य घेतच नाहीत त्यांना शिधापत्रिकेवरून धान्य देणे बंद केल्यास गैरव्यवहार कमी होतील व जास्त गरजू कुटुंबांना शिधापत्रिकेवर धान्य उपलब्ध करून देता येईल. याचा सांगोपांग विचार करून राज्यामध्ये दिनांक ५ मे, १९९९ पासून तिहेरी कार्ड योजना लागू करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने राज्यामध्ये सर्व शिधापत्रिकाधारकांना पुढील निकषाप्रमाणे तीन रंगाच्या शिधापत्रिका वितरीत करण्यात येतात.

**(अ) पिवळ्या शिधापत्रिकांसाठी निकष :–**

लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या लाभार्थ्यांना (बी.पी.एल.) पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकेसाठी—

(i) आयआरडीपीच्या सन १९९७-१९९८ च्या यादीत नाव समाविष्ट असणे व कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये १५,००० या मर्यादेत असले पाहिजे.

(ii) कुटुंबातील कोणतीही व्यक्ती डॉक्टर, वकील, स्थापत्य विशारद, चार्टर्ड अकाऊन्टन्ट नसावी.

(iii) कुटुंबातील कोणतीही व्यक्ती व्यवसाय कर, विक्रीकर किंवा आयकर भरत नसावी किंवा भरण्यास पात्र नसावी.

(iv) कुटुंबाकडे निवासी दूरध्वनी नसावा.

(v) कुटुंबाकडे चारचाकी वाहन नसावे.

(vi) कुटुंबातील सर्व व्यक्तींच्या नावे एकूण दोन हेक्टर जिरायत किंवा एक हेक्टर हंगामी बागायत किंवा अर्धा हेक्टर बारमाही बागायत (दुष्काळी तालुक्यात त्याच्या दुप्पट क्षेत्र) जमीन नसावी.

- शासन निर्णय, दिनांक ९ सप्टेंबर, २००८ अन्वये राज्यातील सर्व विडी कामगार तसेच सर्व पारधी व कोल्हाटी समाजाच्या कुटुंबांना आणि शासन निर्णय, दिनांक २९ सप्टेंबर, २००८, दिनांक २१ फेब्रुवारी, २००९ व दिनांक १७ जानेवारी, २०११ अन्वये परित्यक्त्या व निराधार स्त्रियांना बी.पी.एल. शिधापत्रिकांचे लाभ तात्पुरत्या स्वरुपात देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
- शासन निर्णय, दिनांक १७-३-२००३ अन्वये बंद पडलेल्या कापड गिरण्या, सूत गिरण्या, साखर कारखाने, इ. मधील कामगारांना पिवळ्या शिधापत्रिकांचे लाभ तात्पुरत्या स्वरुपात देण्याचा निर्णय घेतला आहे.

**(ब)-१ केशरी शिधापत्रिकेसाठी निकष :–**

लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या लाभार्थ्यांना (ए.पी.एल.) केसरी रंगाच्या शिधापत्रिकेसाठी—

(i) कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रुपये १५,००० पेक्षा जास्त परंतु रुपये १ लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त नसावे.

(ii) कुटुंबातील कोणाही व्यक्तीकडे चारचाकी यांत्रिक वाहन नसावे (टॅक्सी चालक वगळून).

(iii) कुटुंबातील सर्व व्यक्तींच्या नावे मिळून ४ हेक्टर किंवा त्यापेक्षा जास्त बारमाही बागायती जमीन असू नये.

**(ब)-२ प्राधान्य गटातील शिधापत्रिकेसाठी निकष :—**

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी निकष ठरवितांना लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत लाभ घेत असलेल्या (ब-१) मधील लाभार्थ्यांपैकी ज्या लाभार्थ्यांनी सन २०११ मध्ये विहित नमुन्यात वार्षिक कौटुंबिक उत्पन्न नमूद केले आहे, त्या उत्पन्नानुसार शहरी भागात कमाल रु. ५९,००० पर्यंत वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या लाभार्थ्यांचा पात्र लाभार्थी म्हणून व ग्रामीण भागात कमाल रु. ४४,००० पर्यंत वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या लाभार्थ्यांचा पात्र लाभार्थी म्हणून समावेश करणेबाबत दिनांक १७-१२-२०१३ च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला आहे. सदर लाभार्थ्यांकडील केशरी शिधापत्रिकांवर प्रथम पृष्ठावर "वरील उजव्या कोपऱ्यात" **"प्राधान्य कुटुंबातील लाभार्थी"** असा शिक्का मारण्यात आला आहे.

**(क) शुभ्र शिधापत्रिकांसाठी निकष :—**

ज्या कुटुंबातील सर्व व्यक्तींचे मिळून एकत्रित वार्षिक उत्पन्न रुपये १ लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त असेल किंवा त्या कुटुंबातील कोणाही व्यक्तीकडे चारचाकी यांत्रिक वाहन असेल किंवा कुटुंबातील सर्व व्यक्तींच्या नावे मिळून चार हेक्टरपेक्षा जास्त बारमाही बागायती शेतजमीन असेल अशा कुटुंबांना शुभ्र शिधापत्रिका देण्यात येतात.

दिनांक ३०-०४-२०२२ अखेर राज्यात कार्यरत शिधापत्रिकांची संख्या—

| AAY<br>पिवळी | PHH<br>केशरी | APL<br>शेतकरी | NPH | अन्नपुर्णा | शुभ्र | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| २४,६५,१३१ | १,२७,६५,१७२ | ९,३२,७७४ | ७३,२७,८०५ | ७,४०५ | २२,४८,०२४ | २,५७,४६,३११ |

**(i) अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियमांतर्गत सुटका करण्यात आलेल्या पिडीत महिलांना शिधापत्रिका देण्याबाबत :–**

मा. सर्वोच्च न्यायालयाने बुद्धदेव करमासकर विरुद्ध पश्चिम बंगाल शासन व इतर Criminal Appeal No. १३५/२०१० मध्ये दिनांक १४ डिसेंबर, २०२१ अन्वये शिधापत्रिका वितरीत करण्याची कार्यवाही सुरळीत करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था व राज्य एड्स नियंत्रण संस्था यांचेकडील यादीतील स्वयंसेवी संस्थांकडून अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियमांतर्गत सुटका करण्यात आलेल्या पिडीत महिला व वेश्या व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या महिलांना अनुज्ञेय शिधापत्रिका वितरीत करण्याकरिता, नवीन शिधापत्रिकेसाठी प्रचलित पद्धतीनुसार आवश्यक असलेले पुरावे सादर करण्यामध्ये त्यांना येणाऱ्या अडचणींचा सहानुभूतीपूर्वक विचार करून ओळखीचा पुरावा (Identification Proof) व वास्तव्याचा पुरावा (Residential Proof) सादर करण्यापासून सूट देण्याचा निर्णय, शासन निर्णय दिनांक १३ जानेवारी, २०२२ अन्वये घेण्यात आला आहे.

**(ii) तृतीय पंथीय नागरिकांना शिधापत्रिका देण्याबाबत :–**

तृतीय पंथीय व्यक्तींना सर्वसामान्य जनतेप्रमाणे शिधापत्रिका वितरीत करताना कागदोपत्री अडचणींचा सामना करावा लागतो. तृतीय पंथीय व्यक्ती हा समाजाचा घटक असून त्यांनाही सन्मानाने जगण्याचा व शासकीय योजनांचा लाभ घेण्याचा मुलभूत अधिकार आहे. ही बाब विचारात घेता राज्यातील तृतीय पंथीयांना नवीन शिधापत्रिका मिळविण्यासाठी येणाऱ्या अडचणींचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचा लाभ देण्यासाठी सुलभ कार्यपद्धती अनुसरून त्यांना पात्रतेनुसार योग्य ती शिधापत्रिका देऊन त्यावरील अनुज्ञेय लाभ देण्याचा दि. २७ सप्टेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला आहे.

**अपात्र शिधापत्रिका शोध मोहिम :–**

राज्यातील बनावट/बोगस/अपात्र शिधापत्रिका शोधून रद्द करण्याकरिता राज्यात सन २००९ व २०११ मध्ये अपात्र शिधापत्रिका शोध मोहिम राबविण्यात आली होती.

सदर मोहिमेअंतर्गत शिधापत्रिकाधारकांकडून आवश्यक त्या कागदपत्रांवर विहित नमुन्यात अर्ज भरून घेण्यात आले होते. ज्या शिधापत्रिकाधारकांनी विहित मुदतीत वरीलप्रमाणे आवश्यक ती कागदपत्रे व अर्ज भरून दिले आहेत, त्यांच्या शिधापत्रिका पूर्ववत सुरू करण्यात आल्या. तसेच ज्या शिधापत्रिकाधारकांनी वाढीव मुदतीतही अर्ज व कागदपत्रे सादर केली नाहीत त्यांच्या शिधापत्रिका निलंबित/रद्द करण्यात आल्या असून अशा शिधापत्रिकांवरील शिधावस्तुंचा पुरवठा थांबविण्यात आला आहे. रद्द करण्यात येणाऱ्या शिधापत्रिका ज्या दुकानात/केरोसिन परवानाधारकांस जोडण्यात आल्या होत्या त्या रास्तभाव दुकानदारांचे धान्याचे नियतन व केरोसिन परवानाधारकांचे केरोसिनचे नियतन त्या प्रमाणात कमी करण्यात यावे, अशाही सूचना देण्यात आल्या होत्या.

सन २०११ च्या अपात्र शिधापत्रिका शोध मोहिमेत विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक पुरावे सादर न केल्यामुळे ज्या लाभधारकांच्या शिधापत्रिका रद्द करण्यात आल्या होत्या अशा लाभधारकांना दि. १-४-२०१२ ते दि. १५-८-२०१२ या कालावधीत आवश्यक ते विहित नमुन्यातील अर्ज व पुरावे सादर करण्यासाठी विशेष संधी शासनाने दिली होती.

निकषात न बसणाऱ्या शिधापत्रिका तात्काळ अपात्र ठरवून त्या रद्द करण्यात याव्यात व संबंधितांच्या मागणीनुसार त्यांना अन्य अनुज्ञेय शिधापत्रिका देण्याची कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे दुबार, अस्तित्वात नसलेल्या व्यक्ती, मयत व्यक्ती व अपात्र शिधापत्रिकांसाठी शोध मोहिम घेऊन त्या रद्द करण्याचे निर्देश शासन परिपत्रक दिनांक १७-०७-२०१९ नुसार देण्यात आलेले आहे. तसेच दिनांक २८-०१-२०२१ च्या शासन परिपत्रकान्वये अपात्र शिधापत्रिका विशेष शोध मोहिम राबविण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. राज्यामधील कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव, मनुष्यबळाचा अभाव इ. मुळे अपात्र शिधापत्रिका मोहिमेस दिनांक ०१-०४-२०२१ च्या शासन परिपत्रकान्वये स्थगिती देण्यात आली आहे.

**३.३ अन्नधान्याचे नियतन, उचल व वाटप दर्शविणारा तक्ता–** (आकडे मे. टनात)

| योजनेचे नाव व वर्ष | केंद्र शासनाकडून प्राप्त नियतन | | भारतीय अन्न महामंडळाकडून केलेली उचल | | स्वस्त धान्य दुकानदारांना केलेले वाटप | |
|---|---|---|---|---|---|---|
| | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| **सन २०२२-२०२३ (प्रत्यक्ष- माहे एप्रिल, २०२२ ते नोव्हेंबर, २०२२)—** | | | | | | |
| एपीएल (शेतकरी) | १०१२४० | ५८६४८ | २७७६० | ३८४३७ | १८२४० | २६००७ |
| प्राधान्य कुटुंब लाभार्थी | ९७२००० | १३९७१७६ | ७४५०५३ | ९०५३३३ | ५९४४०१ | ७३७१९२ |
| अंत्योदय | २८७८२७ | ४१३७२२ | २१७४४४ | २५४६९९ | १६८१३५ | २०४२१९ |
| एकूण... | १३६१०६७ | १८६९५४६ | ९९०२५७ | ११९८४६९ | ७८०७७६ | ९६७४१८ |
| **सन २०२२-२०२३ (अंदाजित- माहे डिसेंबर, २०२२ ते मार्च, २०२३)—** | | | | | | |
| एपीएल (शेतकरी) | ५०६२० | २९३२४ | ५०६२० | २९३२४ | ५०६२० | २९३२४ |
| प्राधान्य कुटुंब लाभार्थी | ४२७१३६ | ७५९३५८ | ४२७१३६ | ७५९३५८ | ४२७१३६ | ७५९३५८ |
| अंत्योदय | १२६३७१ | २२४६६३ | १२६३७१ | २२४६६३ | १२६३७१ | २२४६६३ |
| एकूण... | ६०४१२७ | १०१३३४५ | ६०४१२७ | १०१३३४५ | ६०४१२७ | १०१३३४५ |
| **सन २०२३-२०२४ (अंदाजित- माहे एप्रिल, २०२३ ते मार्च, २०२४)—** | | | | | | |
| एपीएल (शेतकरी) | १५१८६० | ८७९७२ | १५१८६० | ८७९७२ | १५१८६० | ८७९७२ |
| प्राधान्य कुटुंब लाभार्थी | १२८१४०८ | २२७८०७३ | १२८१४०८ | २२७८०७३ | १२८१४०८ | २२७८०७३ |
| अंत्योदय | ३७९११४ | ६७३९८९ | ३७९११४ | ६७३९८९ | ३७९११४ | ६७३९८९ |
| एकूण... | १८१२३८२ | ३०४००३४ | १८१२३८२ | ३०४००३४ | १८१२३८२ | ३०४००३४ |

माहे फेब्रुवारी, २०१४ पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत शासन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, ना. पु.-२२ यांचे स्तरावरून राज्याकरिता प्राधान्य कुटुंब लाभार्थी व अंत्योदय अन्न इत्यादी योजनेसाठी गहू व तांदूळाचे नियतन मंजूर करण्यात येते. तसेच राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न होणाऱ्या परंतू सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये लाभ घेत असलेल्या एपीएल (शेतकरी) लाभार्थ्यांसाठी शासनाकडून नियतन मंजूर करण्यात आलेले आहे. सदर नियतनाची राज्यातील जिल्ह्यांनी भारतीय अन्न महामंडळाच्या डेपोतून केलेली उचल व उचलीपोटी स्वस्त धान्य दुकानदारांना केलेले वाटप याबाबतची आकडेवारी मा. नियंत्रक शिधावाटप संचालनालय, नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई तसेच उप आयुक्त (पुरवठा), सर्व विभाग यांचेकडून दरमहा प्राप्त करून घेवून दरवर्षी अधिवेशनाकरिता तयार करण्यात येणाऱ्या मास्टर नोट, आढावा बैठक, आर्थिक पाहणी, कार्यक्रम अंदाजपत्रक व आठमाही अंदाजपत्रकाकरिता या कार्यालयाकडून वेळोवेळी सादर केली जाते. तरी सन २०२२-२३ करिता केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले नियतन व त्याच प्रमाणात सन २०२३-२४ मध्ये देखील उचल व वाटप होईल असा अंदाज मागील पृष्ठावरील विवरणपत्रात दर्शविण्यात आलेला आहे.

**३.३.१ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ ची अंमलबजावणी–**

केंद्र शासनाने दि. ५ जुलै २०१३ पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ देशात लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार देशपातळीवर ग्रामीण भागातील ७५ टक्के व शहरी भागातील ५० टक्के नागरिक प्रत्येक महिन्यास अनुदानित दराने धान्य मिळण्यास हक्कदार असतील. यापैकी सध्या लाभ घेत असलेल्या अंत्योदय अन्न योजनेखालील सर्व लाभार्थ्यांना प्रचलित निकषाप्रमाणे प्रति माह प्रति शिधापत्रिका ३५ किलो धान्याचे वाटप चालू राहील तर प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना प्रति माह प्रति व्यक्ती ५ किलो या प्रमाणात अन्नधान्य मिळेल.

रास्तभाव दुकानातून रु. ३ प्रति किलो या दराने तांदूळ, रु. २ प्रति किलो या दराने गहू व रु. १ प्रति किलो या दराने भरडधान्य देण्याची तरतूद अधिनियमात आहे.

सदर अधिनियमातील तरतुदीनुसार सवलतीच्या दराने धान्य मिळण्यास राज्यातील पात्र लोकसंख्येची व्याप्ती खालीलप्रमाणे आहे.

| ग्रामीण | शहरी | एकूण |
|---|---|---|
| ७६.३२ टक्के (४.७० कोटी) | ४५.३४ टक्के (२.३० कोटी) | ६२.३० टक्के (७.०० कोटी) |

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी निकष ठरविण्याबाबत मा. मंत्रीमंडळ उपसमितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने सद्यःस्थितीत लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत लाभ घेत असलेल्या लाभार्थ्यांनी सन २०११ मध्ये विहित नमुन्यात नमूद केलेल्या वार्षिक कौटुंबिक उत्पन्नानुसार शहरी भागात कमाल रु. ५९,००० पर्यंत उत्पन्न असणाऱ्या लाभार्थ्याचा पात्र लाभार्थी म्हणून व ग्रामीण भागात कमाल रु. ४४,००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या लाभार्थ्याचा पात्र लाभार्थी म्हणून समावेश करण्याबाबत दिनांक १७-१२-२०१३ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

राज्यात दिनांक १ फेब्रुवारी २०१४ पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ लागू करण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनाने राज्याला दिलेला लाभार्थ्यांचा ७००.१७ लक्ष एवढा इष्टांक विचारात घेऊन केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक १०-१२-२०१४ च्या पत्रान्वये ३,८३,७६६ मे. टन (१,६८,४२८ मे. टन तांदूळ व २,१५,३४१ मे. टन गहू) अन्नधान्याचे नियतन दिले आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत इष्टांकाच्या मर्यादेमुळे जे लाभार्थी लाभ मिळण्यापासून वगळले गेले, म्हणजेच दिनांक १ फेब्रुवारी २०१४ पूर्वी ज्या लाभार्थ्यांना सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ मिळत होता. अशा सुमारे १७७.१९ लक्ष लाभार्थ्यांना माहे मे २०१४ ते ऑक्टोबर २०१४ या कालावधीकरिता वरील अधिनियमानुसार अन्नधान्य देण्यात आले आहे. परंतु, एपीएल (केशरी) गटातील सदर लाभार्थ्यांना अन्नधान्य देण्याबाबतच्या निर्णयास स्थगिती देण्यात आली असून, राज्यातील आधार सिडींगचे काम पूर्ण झाल्यावर सदर लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल, असा शासन निर्णय दिनांक १५ जानेवारी २०१६ रोजी निर्गमित करण्यात आला होता. दिनांक १३ ऑक्टोबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये नवीन लाभार्थ्यांची निवड करतांना दिनांक ३० सप्टेंबर २०१६ पर्यंतच्या शिधापत्रिकांचा समावेश करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला होता. राज्यातील आधार सिडींगचे काम अद्यापही सुरू असल्याने, राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये जास्तीत जास्त योग्य व गरजु लाभार्थ्यांचा समावेश व्हावा या दृष्टीने शासन निर्णय, दिनांक ६ जुलै २०१९ अन्वये राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेमध्ये सवलतीच्या दराने अन्नधान्य मिळण्याकरिता नवीन पात्र लाभार्थ्यांची निवड करतांना, दिनांक ३० जून २०१९ पर्यंतच्या योग्य व गरजू असलेल्या पात्र शिधापत्रिका धारकांचा समावेश करण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने दिनांक ३ मार्च २०१७ च्या शासन निर्णयानुसार दिलेल्या इष्टांकाची पूर्तता केल्यानंतर आवश्यक अतिरिक्त इष्टांक तसेच इष्टांक पूर्ततेअभावी समर्पित करावयाच्या इष्टांकाची माहिती क्षेत्रीय कार्यालयाकडून मागविण्यात आली. त्यानुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत राज्यातील जिल्हानिहाय इष्टांकात शासन निर्णय, दिनांक १६ नोव्हेंबर २०१८ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत सवलतीच्या दराने अन्नधान्य देण्याकरिता शासनावर येणारा आर्थिक भार कमी होण्याच्या दृष्टीने तसेच योग्य व गरजू लाभार्थ्यांना सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ मिळावा या उद्दिष्टासाठी "अनुदानातून बाहेर पडा" (Opt Out of Subsidy) ही योजना सुरु करण्याचा निर्णय दिनांक १९-१०-२०१६ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत केंद्र शासनाने मंजूर केलेल्या नियतनानुसार माहे जानेवारी २०२० करिता उपलब्ध करून देण्यात आलेल्या मासिक नियतनाचा तपशील खालीलप्रमाणे—

(आकडे मे. टनात)

| नियतनाचा प्रकार | अन्नधान्य | अंत्योदय व प्राधान्य गटातील शिधापत्रिकाधारक (पिवळ्या व केशरी शिधापत्रिकाधारक) | | |
|---|---|---|---|---|
| | | अंत्योदय अन्न योजना | प्राधान्य कुटुंब गट | एकूण (३+४) |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| नियमित | तांदूळ | ४२१८३ | १२६२४२ | १६८४२५ |
| | गहू | ४५४९७ | १६९८३८ | २१५३३५ |
| | एकूण ... | ८७६८० | २९६०८० | ३८३७६० |

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत वितरित करावयाच्या अन्नधान्याचे नियतन, दर व परिमाण**

| कार्डाचा प्रकार | धान्य प्रकार | केंद्रीय विक्री दर (रु. प्रति क्विंटल) | बहिर्गोदाम दर (रु. प्रति क्विंटल) | दुकानदाराचे मार्जिन (रु. प्रति क्विंटल) | किरकोळ विक्री दर (रु. प्रति किलो) | दरमहा धान्य वितरणाचे परिमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| अंत्योदय अन्न योजना. | तांदूळ | ३०० | २३० | १५० | ३ | ३५ किलो प्रति शिधापत्रिका. |
| | गहू | २०० | १३० | १५० | २ | |
| | ज्वारी | १०० | ३० | १५० | १ | |
| प्राधान्य कुटुंब | तांदूळ | ३०० | २३० | १५० | ३ | प्रतिव्यक्ती ५ किलो. |
| | गहू | २०० | १३० | १५० | २ | |
| | ज्वारी | १०० | ३० | १५० | १ | |
| | गहू | ... | ६५० | १५० | ७.२० | |

**३.३.२ मराठवाडा व विदर्भातील १४ जिल्ह्यांतील सर्व शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेच्या धर्तीवर अन्नधान्याचा लाभ देण्याबाबत–**

राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने औरंगाबाद विभागातील औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली व अमरावती विभागातील अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व नागपूर विभागातील वर्धा या १४ जिल्ह्यांतील एपीएल (केशरी) मधील सर्व शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेच्या धर्तीवर सवलतीच्या दराने अन्नधान्याचा पुरवठा करण्याचा निर्णय, दिनांक २३ जुलै २०१५ च्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

त्याअनुषंगाने लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये ज्या लाभार्थ्यांना सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ मिळत होता, परंतू राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत केंद्र शासनाने घालून दिलेल्या लाभार्थ्यांच्या इष्टांकाच्या मर्यादेमुळे जे लाभार्थी राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट होऊ शकले नाहीत, अशा एपीएल (केशरी) मधील लाभार्थ्यांतील उपरोक्त १४ जिल्ह्यांतील सर्व शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेमध्ये प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना ज्या दराने (तांदूळ रु. ३ प्रति किलो व गहू रु. २ प्रति किलो) व परिमानात (प्रती व्यक्ती प्रतिमाह ५ किलो अन्नधान्य) अन्नधान्याचा लाभ दिला जातो, त्याच परिमाणात व त्याच दराने अन्नधान्याचा लाभ देण्याबाबतचा शासन निर्णय, दिनांक २४ जुलै २०१५ रोजी निर्गमित करण्यात आला. सदर शासन निर्णयानुसार सदर लाभार्थ्यांकरिता आवश्यक असलेल्या २४,४९९ मे. टन (१५,५१४ मे. टन गहू व ८,९८५ मे. टन तांदूळ) अन्नधान्याची खरेदी केंद्र शासनाकडून Economic Cost ने (गहू रु. २६,८३८.४ प्रति मे. टन व तांदूळ रु. ३७,२६७.६ प्रति मे. टन) करून माहे डिसेंबर २०२० पर्यंत अन्नधान्याचे नियतन देण्यात आले आहे.

सदर योजनेसाठी केंद्र शासनाकडून माहे मार्च २०२१ पर्यंत अन्नधान्याचे नियतन प्राप्त झाले आहे. त्यानुसार उपरोक्त १४ जिल्ह्यांसाठी माहे डिसेंबर २०२० पर्यंत जिल्हानिहाय नियतन देण्यात आले आहे.

**राज्य अन्न आयोग :–**

महाराष्ट्र राज्यामध्ये दिनांक १ फेब्रुवारी २०१४ पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ ची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमातील कलम १६ नुसार राज्यामध्ये "राज्य अन्न आयोग" गठीत करण्याबाबतची तरतूद आहे. सदर अधिनियमातील कलम १६ ते १८ मधील तरतुदीनुसार सदर अधिनियमाची अंमलबजावणी करण्यापूर्वी राज्य अन्न आयोगास विहित केलेली कामे पार पाडण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १०-१-२०१४ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली होती. आता दिनांक ११ एप्रिल २०१७ च्या अधिसूचनेद्वारे राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ (२०१३ चा २०) मधील कलम १६ (१) द्वारा प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, राज्य शासन, राज्य अन्न आयोग गठीत करण्यात आला आहे. सदर आयोगाच्या अध्यक्षपदी दिनांक ११ एप्रिल २०१७ च्या अधिसूचनेमध्ये श्री अरुण देशपांडे यांची नेमणूक करण्यात आली आहे व इतर ४ सदस्यांची नेमणूक करण्यात आली आहे. दिनांक २ मे २०१७ च्या अधिसूचनेअन्वये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ मधील कलम १६ (२) मधील तरतुदीनुसार आयोगातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या सदस्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ च्या कलम १६ (६) मध्ये नमूद केलेली कार्ये सदर अन्न आयोग पार पाडील.

**जिल्हा तक्रार निवारण अधिकारी :–**

दिनांक ७ एप्रिल २०१७ च्या अधिसूचनेअन्वये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत राज्यातील जनतेकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी सदर अधिनियमाच्या कलम १५ अन्वये संबंधित जिल्ह्यांतील अन्न सुरक्षा योजनेशी संबंधित नसलेले "अपर जिल्हाधिकारी" यांची "जिल्हा तक्रार निवारण अधिकारी" म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील प्राप्त तक्रारीचे निराकरण करण्यासाठी सदर शिधावाटप क्षेत्र ज्या महसुली जिल्ह्यांमध्ये आहे, त्या मुंबई, मुंबई उपनगर व ठाणे या जिल्ह्यांतील "अपर जिल्हाधिकारी" यांची या कार्यक्षेत्राचे जिल्हा तक्रार निवारण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना :**

कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेची अंमलबजावणी सुरू केली आहे. सदर योजनेंतर्गत लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांसाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेल्या अन्नधान्याव्यतिरिक्त प्रतिमाह प्रति सदस्य ५ किलो अन्नधान्य व प्रतिमाह प्रति कुटुंब १ किलो डाळ मोफत वितरीत करण्यात येत आहे. राज्यातील सुमारे ७००.१७ लक्ष लाभार्थ्यांना उपरोक्त मोफत अन्नधान्याचा लाभ मिळत आहे.

सदर योजनेंतर्गत माहे एप्रिल २०२० ते जून २०२० या कालावधीकरिता पात्र लाभार्थ्यांना प्रतिमाह प्रति सदस्य ५ किलो तांदूळ व प्रतिमाह प्रति कुटुंब १ किलो चणा डाळ/तुर डाळ मोफत वितरीत करण्यात आली आहे. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेस माहे नाव्हेंबर २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून केंद्र शासनाकडून माहे जुलै २०२० ते नाव्हेंबर २०२० या कालावधीकरिता ३,५०,०८५ मे. टन (१,९६,४३३ मे. टन गहू व १,५३,६५२ मे. टन तांदूळ) अन्नधान्याचे नियतन प्राप्त झाले आहे. त्यानुसार माहे सप्टेंबर २०२० पर्यंत जिल्हानिहाय नियतन देण्यात आले असून त्यानुसार पात्र लाभार्थ्यांना प्रतिमाह प्रति सदस्य ५ किलो अन्नधान्य (गहू व तांदूळ) वितरीत करण्यात येणार आहे.

प्रस्तुत योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून माहे जुलै २०२० ते नाव्हेंबर २०२० या कालावधीकरिता अख्खा चणा प्राप्त होणार आहे. तथापि, राज्यात अख्ख्या चण्याऐवजी चणा डाळीस अधिक पसंती असल्याने केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या चण्याची भरडाई करून त्यापासून प्राप्त झालेली चणा डाळ पात्र लाभार्थ्यांना वितरीत करण्याचा निर्णय, दिनांक १८ ऑगस्ट २०२० च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला असून त्यानुसार माहे जुलै २०२० ते नोव्हेंबर २०२०

या कालावधीत प्रतिमाह प्रति कुटुंब १ किलो चणा डाळ मोफत वितरीत करण्यात येणार आहे. त्याकरिता राज्य शासनास सुमारे रु. ७३ कोटी इतका आर्थिक भार सोसावा लागणार आहे.

**एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांसाठी सवलतीच्या दराने अन्नधान्य :**

देशातील नोव्हेल कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना व शेतकरी योजनेंतर्गत समाविष्ट न झालेल्या परंतु ज्याचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रु. १ लाखापर्यंत आहे अशा एपीएल (केशरी) शिधापत्रिका धारकांना दिनांक ९ एप्रिल २०२० च्या शासन निर्णयान्वये माहे मे व जून २०२० या २ महिन्याकरिता सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ७१,५४,७३८ एपीएल (केशरी) शिधापत्रिकांवरील ३,०८,४४,०७६ एवढ्या लाभार्थ्यांना प्रतिव्यक्ती प्रतिमाह ३ किलो गहू (रु. ८ प्रति किलो) व २ किलो तांदूळ (रु. १२ प्रति किलो) याप्रमाणे अन्नधान्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. दिनांक १० जुलै २०२० च्या शासन निर्णयानुसार या योजनेची मुदत वाढविण्यात आली असून सदर लाभार्थ्यांना माहे ऑगस्ट २०२० पर्यंत सवलतीतील अन्नधान्याचा लाभ देण्यात आला आहे.

**आत्मनिर्भर भारत वित्तीय पॅकेज अंतर्गत मोफत अन्नधान्याचे वितरण :**

कोरोना विषाणू प्रादुर्भाव रोखण्याच्या दृष्टीने लावण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे राज्यात अडकलेल्या स्थलांतरीतांसाठी तसेच राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना व राज्य शासनाच्या कोणत्याही योजनेत समाविष्ट नसलेल्या विना शिधापत्रिका धारकांसाठी केंद्र शासनाने आत्मनिर्भर भारत वित्तीय पॅकेज अंतर्गत मोफत अन्नधान्य (प्रति सदस्य ५ किलो तांदूळ व प्रति कुटुंब १ किलो अख्खा चणा) उपलब्ध करून दिले आहे. त्यानुसार दि. १९ मे २०२० च्या शासन निर्णयान्वये सदर लाभार्थ्यांना माहे मे व जून २०२० करिता मोफत तांदूळ उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच दिनांक २७ मे २०२० च्या शासन पत्रान्वये सदर लाभार्थ्यांना माहे मे व जून २०२० करिता मोफत चण्याचे जिल्हानिहाय नियतन देण्यात आले आहे. केंद्र शासनाने दिलेल्या सूचनानुसार प्रस्तुत योजनेंतर्गत अन्नधान्य वितरण करण्याची मुदत दिनांक ३१ ऑगस्ट २०२० पर्यंत वाढविण्यात आली असून त्यानुसार पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वितरण करण्यात आले आहे.

**तूर डाळ :** राज्यातील स्वस्त धान्य दुकानातून सर्व प्रकारच्या शिधापत्रिकांवर कार्डधारकाच्या मागणीप्रमाणे आणि सध्या राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत समाविष्ट करण्यात आलेल्या अंत्योदय अन्न योजनेतील व प्राधान्य कुटुंबांच्या लाभार्थ्यांतील सर्व शिधापत्रिकाधारकांना POS मशीनद्वारे तूर डाळीची विक्री करण्याबाबतचा निर्णय सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दि. २८-११-२०१७ शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. सदर तूर डाळ रु. ३५ या दराने विक्री करण्यात येत असून त्याकरिता रास्तभाव दुकानदारास प्रतिकिलो रु. १.५० एवढे कमिशन दिले जात आहे.

**चणा डाळ व उडीद डाळ :** केंद्र शासनाकडून अनुदानीत दराने मिळणाऱ्या चणा व उडीदापासून प्राप्त होणाऱ्या डाळींचे लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना प्रति शिधापत्रिका एकूण २ किलो डाळी (चणा डाळ १ किलो आणि उडीद डाळ १ किलो किंवा दोन्हीपैकी एक डाळ २ किलो या कमाल मर्यादेत) याप्रमाणे वितरीत करण्याचा निर्णय, दिनांक १७ ऑक्टोबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

त्यानुसार चणा डाळ प्रति किलो रु. ३५ या दराने व उडीद डाळ प्रति किलो रु. ४४ या दराने माहे नोव्हेंबर २०१८ पासून वितरीत करण्यात येत आहे. याकरिता रास्तभाव दुकानदारास प्रति किलो रु. १.५० मार्जीन देण्यात येणार आहे.

**३.३.३ केंद्रीय अन्नपुर्णा योजना :**

राज्यात केंद्रीय अन्नपुर्णा योजनेची अंमलबजावणी दि. १ एप्रिल, २००१ पासून सुरू करण्यात आली. ही योजना १०० टक्के केंद्र पुरस्कृत आहे. या योजनेअंतर्गत ६५ वर्षे किंवा त्यावरील निराधार स्त्री/पुरुष यांना दरमहा १० किलो धान्य मोफत देण्यात येते. या योजनेचा लाभ देण्यासाठी लाभार्थी पात्रता निकष विहित करण्यात आले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने ज्या व्यक्तींना केंद्र वा राज्य पुरस्कृत योजनेअंतर्गत निवृत्ती वेतन योजनेचा लाभ मिळत नाही, अशी व्यक्ती या योजनेसाठी पात्र आहे. अन्नपुर्णा योजनेसाठी १,२०,००० इतका इष्टांक देण्यात आला आहे. केंद्र शासनाने दिनांक २४-१०-२०१९ रोजीच्या पत्रान्वये एप्रिल, २०१९ ते सप्टेंबर, २०१९ या सहामाही कालावधीसाठी ६४८० मे. टन गव्हाचे नियतन मंजूर केले. तथापि, अन्नपुर्णा योजनेतील लाभार्थ्यांची संख्या अत्यल्प असल्याने सदर नियतन समर्पित करण्यात आले. राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये अन्नपुर्णा योजनेचे लाभार्थी आहेत. सदर लाभार्थ्यांना जिल्ह्यांकडील शिल्लक नियतनातून अन्नधान्याचे वाटप करण्याचे आदेश क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आले. सन २०२२-२३ साठी केंद्र शासनाकडून या योजनेंतर्गत अन्नधान्य प्राप्त झालेले नाही.

**३.३.४ कल्याणकारी संस्था, वसतिगृहे, आश्रमशाळा इत्यादी संस्थांना बीपीएल दराने धान्य वितरणाची योजना :**

राज्यातील कल्याणकारी संस्थांना प्रत्येक लाभार्थ्यास दरमाह १५ किलो याप्रमाणे धान्याचे वितरण करण्याकरिता केंद्र शासन बी.पी.एल. दराने अन्नधान्याचे (गहू व तांदूळ) अतिरिक्त नियतन मंजूर करते. त्यानुसार या विभागाच्या दिनांक २६-४-२००२ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदर धान्याचे वितरण करण्यात येते. शासन निर्णय, दिनांक २६-४-२००२ मधील परिच्छेद क्र. ४ मध्ये आस्थापना शिधापत्रिका देण्याची कार्यवाही विषद करण्यात आली आहे. प्रस्तुत योजनेअंतर्गत आस्थापना शिधापत्रिकाधारकांना दरमाह प्रति लाभार्थी १५ किलो धान्याचे प्राप्त नियतनाच्या प्रमाणात वितरण करण्यात येते.

केंद्र शासनाने कल्याणकारी संस्था व वसतिगृहे या योजनेंतर्गत फक्त शासनाच्या मालकीच्या व शासन चालवित असलेल्या संस्थांनाच नियतन वितरित करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला होता. तथापि, केंद्र शासनाने दिनांक १३-०२-२०२० च्या पत्रान्वये कल्याणकारी संस्था व वसतिगृहे योजनेंतर्गत

शासनाच्या मालकीच्या व शासनामार्फत चालविण्यात येत असलेल्या कल्याणकारी संस्थांसह, शासन अनुदानित कल्याणकारी संस्था व वसतिगृहांमधील लाभार्थ्यांसाठी नियतन मंजूर करण्यात येणार असल्याचे कळविले आहे. त्यानुसार सद्यःस्थितीत सदर योजनेंतर्गत अन्नधान्य मिळणाऱ्या शिधापत्रिकाधारक आस्थापनांची संख्या ३८९४ असून त्यातील लाभार्थींची संख्या ३८८१४२ आहे. यामध्ये शासकीय संस्था २१४ असून त्यामधील लाभार्थी संख्या ३२३४१ व शासन अनुदानित संस्थांची संख्या ३६८० असून त्यामधील लाभार्थी संख्या ३५५८५९ आहे. संस्थांना १५ किलो प्रति निवासी अन्नधान्याचे वाटप करण्यात येते.

कल्याणकारी संस्था व वसतिगृहे योजनेंतर्गत माहे एप्रिल, २०२२ ते सप्टेंबर, २०२२ या सहामाहीचे कालावधीकरीता बी. पी. एल. दराने अन्नधान्याचे मासिक नियतन वितरीत करण्यासाठी शासनाच्या मालकीच्या व शासनामार्फत चालविण्यात येत असलेल्या कल्याणकारी संस्थांसह, शासन अनुदानित कल्याणकारी संस्था व वसतिगृहांमधील लाभार्थ्यांसाठी प्रतिमाह २८७०.८०२ मे. टन तांदूळ याप्रमाणे उपरोक्त सहामाहीचे कालावधीसाठी १७२२४.८१२ मे. टन तांदूळ मंजूर केले आहे व तांदळाचे वाटप क्षेत्रीय कार्यालयाना दि. १९-०५-२०२२ च्या आदेशान्वये करण्यात आले आहे.

**३.४.१ अन्नधान्याची साठवणूक :**

(१) सार्वजनिक वितरण प्रणालीमार्फत लाभार्थ्यांना वितरित करावयाचे अन्नधान्य व अन्य जीवनावश्यक वस्तुंची साठवणूक गोदामात केली जाते. गोदामांची साठवणूक क्षमता कोणत्याही एकावेळी जवळजवळ तीन महिन्यांचा अन्नधान्य साठा करण्याकरिता पुरेशी असणे अपेक्षित आहे. अन्नधान्याची साठवणूक करण्याकरिता राज्यामध्ये जिल्हा, तालुका आणि गरजेनुसार अन्य ठिकाणी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत गोदामे बांधलेली आहेत. गरज पडल्यास भाड्याने गोदाम घेऊन देखील अन्नधान्य इ. ची साठवणूक करण्यात येते.

(२) अन्नधान्य साठवण्याकरिता आवश्यक ती साठवणूक क्षमता निर्माण करण्याकरिता नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी अंतर्गत नाबार्डच्या कर्ज सहाय्यातून नवीन गोदामांचे बांधकाम हाती घेण्यात आलेले आहे. याशिवाय अस्तित्वात असलेल्या नादुरुस्त गोदामांची दुरुस्ती करून त्यांचा वापर करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) माहे जून, २०२३ अखेर अस्तित्वात असलेल्या गोदामांची साठवणूक क्षमता इ. चे विवरण सोबत जोडले आहे.—

**३.४.२**

विवरणपत्र "ड"

**राज्यातील जिल्हानिहाय शासकीय गोदाम क्षमता (माहे जून, २०२३ अखेर)** (आकडे मे. टनात)

| अनु-क्रमांक | जिल्ह्याचे नाव | शासकीय गोदाम (माहे जून २०११ पूर्वीची/थोडक्यात जुनी गोदामे) | | शासकीय गोदाम माहे जून २०११ नंतरची (थोडक्यात नव्याने बांधलेली व पुरवठा कार्यालयाने ताब्यात घेतलेली गोदामे) | | एकूण शासकीय गोदामांची संख्या | | नादुरुस्त झाल्यामुळे साठवणूकीस उपयोगी नसलेली गोदामे | | इतरांना भाड्याने दिलेली गोदामे | | इतरांकडून भाड्याने घेतलेली गोदामे | | उपलब्ध गोदामे | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | क्षमता | संख्या | क्षमता | संख्या | क्षमता | संख्या | क्षमता | संख्या | क्षमता | संख्या | क्षमता | संख्या | क्षमता |
| १ | २ | ३ | | ४ | | ५ | | ६ | | ७ | | ८ | | ९ | |
| १. | ठाणे | १६ | ८००० | १ | १०८० | १७ | ९०८० | २ | १००० | ... | ... | ... | ... | १५ | ८०८० |
| २. | पालघर | २२ | ९००० | ३ | ३७५० | २५ | १२७५० | ३ | ८०० | १ | ३०० | ... | ... | २१ | ११६५० |
| ३. | रायगड | ५६ | २३७५० | ४ | ६२४० | ६० | २९९९० | २२ | ८३०० | ... | ... | ... | ... | ३८ | २१६९० |
| ४. | रत्नागिरी | ४५ | १६०५० | ५ | ६७४० | ५० | २२७९० | २५ | ८०५० | १ | २५० | ... | ... | २३ | १४९९० |
| ५. | सिंधुदुर्ग | १४ | ६८०० | ५ | ३८६० | १९ | १०६६० | ३ | १३०० | ... | ... | १ | ३०० | १७ | ९६६० |
| ६. | नाशिक | २८ | १७२०० | १४ | ३४५८० | ४२ | ५१७८० | ९ | ८६५० | ... | ... | ... | ... | ३३ | ४३१३० |
| ७. | धुळे | १७ | ८५०० | ७ | ६९८० | २४ | १५४८० | ३ | १५०० | ... | ... | ... | ... | २१ | १३९८० |
| ८. | नंदुरबार | २६ | १३००० | ६ | ७८२० | ३२ | २०८२० | ६ | ३००० | ... | ... | ... | ... | २६ | १७८२० |
| ९. | जळगाव | ३२ | १३७८० | ८ | १६५६० | ४० | ३०३४० | ९ | २२५० | ... | ... | ३ | १६०० | ३४ | २९६९० |
| १०. | अहमदनगर | ७६ | ५०४५० | ६ | ११७६० | ८२ | ६२२१० | ४१ | २१८५० | ३ | १३०० | ... | ... | ३८ | ३९०६० |
| ११. | पुणे | २२ | १११५० | ६ | १६८०० | २८ | २७९५० | १० | ४३९० | ... | ... | २ | ६९० | २० | २४२५० |
| १२. | सातारा | ४१ | १५२४० | ८ | १२१५० | ४९ | २७३९० | १६ | ४३४० | ... | ... | १ | ३०० | ३४ | २३३५० |
| १३. | सांगली | २८ | १३४६० | ८ | ८८२० | ३६ | २२२८० | ७ | २८५० | ... | ... | ... | ... | २९ | १९४३० |
| १४. | सोलापूर | ४२ | ३१४०० | १० | १२२४० | ५२ | ४३६४० | ५ | १३०० | ... | ... | ... | ... | ४७ | ४२३४० |
| १५. | कोल्हापूर | २१ | १०३०० | ४ | १०८०० | २५ | २११०० | २ | ५५० | ... | ... | ... | ... | २३ | २०५५० |

(आकडे मे. टनात)

| १ | २ | ३ | | ४ | | ५ | | ६ | | ७ | | ८ | | ९ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६. | औरंगाबाद | १८ | १९२५८ | १ | ५०० | १९ | १९७५८ | ७ | ५०३२ | … | … | ५ | ५९०० | १७ | २०६२६ |
| १७. | जालना | १७ | १६५०० | २ | ३८०० | १९ | २०३०० | ९ | ३९०० | … | … | … | … | १० | १६४०० |
| १८. | परभणी | १५ | ८७५० | १ | १०८० | १६ | ९८३० | ४ | १७५० | … | … | २ | १३०० | १४ | ९३८० |
| १९. | हिंगोली | ११ | ६६०० | ५ | ९२४० | १६ | १५८४० | ६ | ५५०० | … | … | … | … | १० | १०३४० |
| २०. | बीड | ३७ | २५८५० | ८ | ११५२० | ४५ | ३७३७० | १४ | ७३१० | … | … | ४ | ४००० | ३५ | ३४०६० |
| २१. | नांदेड | ३४ | १३९५० | १८ | १०७४० | ५२ | २४६९० | १५ | ४७५० | … | … | ३ | २३०० | ४० | २२२४० |
| २२. | उस्मानाबाद | २९ | १७००० | २ | ४८०० | ३१ | २१८०० | ९ | ३३०० | … | … | २ | १००० | २४ | १९५०० |
| २३. | लातूर | २१ | १६४५० | ९ | १०७४० | ३० | २७१९० | ७ | ५६५० | … | … | १ | १३२० | २४ | २२८६० |
| २४. | बुलढाणा | २० | ८३०० | ६ | ४८२० | २६ | १३१२० | ४ | १४०० | … | … | ६ | १५५० | २८ | १३२७० |
| २५. | अकोला | २१ | २२४५० | … | ८३२० | २५ | ७६७०० | १ | ५५०० | … | … | … | … | … | …. |
| २६. | वाशिम | ११ | ५४०० | ५ | ७३२० | १६ | १२७२० | … | … | … | … | … | … | १६ | १२७२० |
| २७. | अमरावती | ३४ | १५६५० | ४ | ४३२० | ३८ | १९९७० | २ | २०० | १ | १०८० | १ | २५० | ३६ | १८९४० |
| २८. | यवतमाळ | ३५ | १७५०० | ९ | ९८६० | ४४ | २७३६० | ११ | ७३८० | … | … | … | … | ३३ | १९९८० |
| २९. | वर्धा | १४ | ८६५० | २ | १००० | १६ | ९६५० | २ | २००० | … | … | … | … | १४ | ७६५० |
| ३०. | नागपूर | ४६ | २२५८८ | १२ | १४८२० | ५८ | ३७४०८ | २१ | ६२३१ | … | … | ४ | ६१०० | ४१ | ३७२७७ |
| ३१. | भंडारा | १४ | ८६०० | ५ | ५५४० | १९ | १४१४० | १ | ६०० | … | … | १ | ५५० | १९ | १४०९० |
| ३२. | गोंदिया | १८ | ११९०० | २ | २१६० | २० | १४०६० | ५ | १२५० | २ | ६०० | … | … | १३ | १२२१० |
| ३३. | चंद्रपूर | २८ | १४२५० | १० | १०२२० | ३८ | २४४७० | ४ | १७५० | ३ | १३०० | … | … | ३१ | २१४२० |
| ३४. | गडचिरोली | २१ | ९०५० | २२ | १६००० | ४३ | २५०५० | ५ | २३५० | ४ | १६०० | … | … | ३४ | २११०० |
| ३५. | मुंबई शहर | १३ | ८७२३.५ | … | … | १३ | ८७२३.५ | ६ | ३२४३ | … | … | … | … | ७ | ५४८०.५ |
| | एकूण … | ९४३ | ५१५५०० | २२२ | २९२९८० | ११६५ | ८०८४८० | २९७ | १३४२२६ | १५ | ६४३० | ३७ | २७६१० | ८९० | ६९५४३३.५ |

**३.५ सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्नधान्य वितरणाची सुधारित पध्दत** :— सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत निर्धारीत दराने व योग्य दर्जाचे धान्य शिधापत्रिकाधारकांना खात्रीशिररीत्या उपलब्ध होईल याची हमी देण्याच्या उद्देशाने शासनाने सुधारित धान्य वितरण प्रणाली राबविण्याबाबत दिनांक २३ फेब्रुवारी, २०१२ रोजी निर्णय घेतला आहे. या सुधारित धान्य वितरण प्रणाली अंतर्गत भारतीय अन्न महामंडळ ते शासकीय धान्य गोदाम व शासकीय धान्य गोदाम ते रास्तभाव दुकानांपर्यंत अन्नधान्याची वाहतूक खुल्या निविदा प्रक्रियेद्वारा जिल्हास्तरावर नियुक्त करण्यात येणाऱ्या वाहतूकदारामार्फत करावयाची आहे.

उपरोक्त धोरणानुसार दि. २६ नोव्हेंबर, २०१२ व दि. २० एप्रिल, २०१७ च्या शासन निर्णयान्वये मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील परिमंडळामध्ये व उर्वरित जिल्ह्यांमध्ये ई-निविदा प्रक्रियेद्वारे वाहतूक कंत्राट निश्चित करण्यात आली होती. या वाहतूक कंत्राटाचा कालावधी संपुष्टात आल्याने, दि. १५ जानेवारी, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये वाहतूक कंत्राटासाठीच्या निविदा प्रक्रियेकरिता सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. या शासन निर्णयातील तरतुदीनुसार निविदा प्रक्रिया कार्यान्वित करण्यात येऊन मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील ५ परिमंडळे व परभणी वगळता ३३ जिल्ह्यांमध्ये नवीन अन्नधान्य वाहतूक कंत्राटे कार्यान्वित करण्यात आली आहेत. परभणी जिल्ह्यातील न्यायालयीन प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशामुळे सद्यःस्थितीत या जिल्ह्यातील अन्नधान्य वाहतूक कंत्राट अंतिम करण्यात आलेले नाही.

**शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणुकीचे हमाल कंत्राट** : —सन २०१४ ते २०१७ या कालावधीसाठी शासन निर्णय, दिनांक १२ सप्टेंबर, २०१४ अन्वये कार्यान्वित करण्यात आलेल्या हमाल कंत्राट मुदत संपल्याने त्यातील धोरणात्मक बाबींमध्ये आवशयम त्या सुधारणा करून पुढील कालावधीमध्ये राज्यातील सर्व जिल्ह्यातील हमाल कंत्राटामध्ये सुसुत्रता आणण्यासाठी माथाडी मंडळाच्या दरांनुसार हमाली दरांची परिगणना करण्यासाठी दि. ०८ मे, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार काही जिल्ह्यांमध्ये हमाल कंत्राटे कार्यान्वित करण्यात आली होती. सदर हमाल कंत्राटाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर सन २०२२ ते २०२५ या कालावधीमध्ये राज्यातील सर्व जिल्ह्यांतील हमाल कंत्राटे निश्चित करण्यासाठी शासन निर्णय दि. ०६ मार्च, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये नविन हमाल कंत्राट धोरण निश्चित करण्यात आले असून या शासन निर्णयातील तरतूदींप्रमाणे हमाल कंत्राट निविदा प्रक्रिया जिल्हा स्तरावर राबविण्याची कार्यवाही चालू आहे.

**शासकीय धान्य गोदामांमध्ये अन्नधान्याच्या हाताळणूकी दरम्यान पोत्यांच्या प्रमाणिकरणासाठी पोती शिवणयंत्रे, हँगींग हुक व धागा यांचा पुरवठा** :- राज्यातील वीज उपलब्ध असलेल्या शासकीय धान्य गोदामांमध्ये अन्नधान्याच्या पोत्यांच्या प्रमाणिकरणादरम्यान पोती शिवण्यासाठी ११०० पोती शिवणयंत्रे, हँगिंग हुक व धागा पुरविण्यात आलेला आहे. उर्वरित गोदामांमध्ये तातडीने वीज उपलब्ध करून घेण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्या असून या गोदामांमध्ये वीज उपलब्ध झाल्यावर त्या गोदामांमध्येही पोती शिवणयंत्रे उपलब्ध करून देण्यात येतील.

**३.६ राज्यभरातील अधिकृत शिधावाटप/रास्तभाव धान्य दुकाने, कार्डधारक व एकांके बाबतची माहिती परिशिष्ट इ मध्ये दर्शविली आहेत.**

शिधापत्रिकाधारकांना शिधावस्तू आणण्यासाठी निवासस्थानापासून ३ कि. मी. पेक्षा जास्त लांब जावे लागू नये या दृष्टीने नवीन रास्त भाव दुकान उघडतांना शिधापत्रिकाधारकांची सोय, भौगोलिक परिस्थिती व दुकानाची व्यवहार्यता विचारात घेतली जाते. ग्रामीण भागात सर्वसाधारणपणे किमान १,००० व कमाल ४,००० एकांके किंवा २,००० लोकसंख्येसाठी एक रास्त भाव दुकान उघडण्यात यावे, तसेच नागरी भागात ६,००० एकांकाकरिता व महानगरपालिका क्षेत्रात ८,००० एकांकांकरिता एक रास्त भाव दुकान असावे, असे धोरण आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक महसुली गावात दुकान उघडण्याचे शासनाचे धोरण आहे.

**३.६.१ राज्यातील रास्तभाव दुकाने व किरकोळ केरोसिन परवाने स्वयंसहायता गटांना देण्याचा निर्णय** :— मा. सर्वोच्च न्यायालयाने याबाबतीत रास्तभाव दुकाने/किरकोळ केरोसिन परवाने स्वयंसहायता गटांना वितरीत करण्याबाबत अंतरिम आदेश दिले आहेत. त्यानुसार, दि. २५-६-२०१० रोजीच्या पत्रान्वये रास्तभाव दुकाने/किरकोळ केरोसिन परवाने स्वयंसहायता गटांना वितरीत करण्याबाबत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

**३.७ दक्षता समित्या :**–सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील देखरेखीत लोकांचा सहभाग राहण्याच्या दृष्टीने या व्यवस्थेमार्फत वितरण होणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंच्या वितरणावर देखरेख ठेवण्यासाठी राज्य शासनाने शासन निर्णय दि. २३ जानेवारी २००८ अन्वये राज्यात सर्वत्र ग्रामस्तर, तालुकास्तर व जिल्हास्तर दक्षता समित्या त्याचप्रमाणे महानगरपालिका असलेल्या शहरात शिधावाटप कार्यालय/विभाग कार्यालय पातळीवर आणि अ, ब आणि क वर्ग नगरपालिका क्षेत्रात दक्षता समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

## ३.८ साखर, रॉकेल, पेट्रोल-डिझेल इत्यादी नियंत्रित वस्तूंचे वितरण :

**३.८.१ (अ) साखर :**

(१) डॉ. सी. रंगराजन समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने दिनांक १७ मे २०१३ च्या आदेशान्वये साखरेवरील नियंत्रण हटविल्यामुळे साखर खुल्या बाजारातून खरेदी करण्यासाठी माहे जुलै २०१४ पासून NCDEX SPOT यांचेकडे नोंदणी केलेल्या पुरवठादारांकडून अत्यंत पारदर्शकपणे व स्पर्धात्मक पद्धतीने ई-लिलावाद्वारे साखर खरेदी करून लाभार्थ्यांना वितरित करण्यात येते.

(२) राज्य शासनाने लाभार्थ्यांना पूर्वीच्याच सवलतीच्या दरात म्हणजेच रु. १३.५० प्रति किलो प्रमाणे साखर वाटप केल्यास राज्य शासनाकडून खुल्या बाजारातून खरेदी करण्यात येणाऱ्या साखरेसाठी व अनुषंगिक खर्चासाठी केंद्र शासन प्रति किलो रु. १८.५० एवढे अनुदान उपलब्ध करून देते. त्यापैकी माहे जुलै २०१४ ते मार्च २०१७ या कालावधीतील साखरेचे अनुदान राज्य शासनास प्राप्त झाले आहे.

(३) केंद्र शासनाच्या १२ मे २०१७ च्या आदेशानुसार व केंद्र शासनाच्या दिनांक १ जून २०१७ च्या मार्गदर्शक सूचनेनुसार फक्त अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांसाठीच प्रती कुटुंब प्रतिमहा १ किलो याप्रमाणे साखर वाटप करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

(४) केंद्र शासनाच्या उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील पात्र लाभार्थ्यांना नियंत्रित दराने पुरवण्यात येणाऱ्या साखरेचे प्रमाण आणि दर सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यासाठी दिनांक २२ मे २०१७ रोजी मंत्रिमंडळ बैठकीत या विषयावर निर्णय घेण्यासाठी मंत्रीमंडळ उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय झाला होता. त्यानुसार दिनांक २७ जून २०१७ रोजी मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

(१) जून २०१७ या महिन्यापासून राज्यातील अंत्योदय लाभार्थ्यांना प्रति कुटुंब १ किलो दरमहा या प्रमाणे साखर वितरीत करण्यात यावी.

(२) जून २०१७ या महिन्यापासून साखरेचा विक्रीचा दर रु. १५ ऐवजी रु. २० प्रति किलो करण्यात यावा.

(५) केंद्र शासनाचा सदर निर्णय उशीरा प्राप्त झाल्यामुळे राज्य शासनाकडून अंत्योदय अन्न योजना तसेच दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांना पूर्वी प्रमाणेच माहे एप्रिल २०१७ ते मे २०१८ या कालावधीत ई-लिलावाद्वारे साखर ऑन लाईन खरेदी करून वाटप करण्यात आले आहे.

माहे एप्रिल २०१७ ते मे २०१८ या कालावधीतील साखरेचे नियतन, उचल व वाटप याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.—

**साखरेचे नियतन, उचल, वाटप (२०१७ ते २०१९)**

(आकडे लाख मे. टन मध्ये)

| वर्ष | नियतन | उचल | वाटप |
|---|---|---|---|
| २०१६–२०१७ | १.७४ | १.७४ | १.७४ |
| २०१७–२०१८ | ०.५९ | ०.५९ | ०.५९ |
| २०१८–२०१९ | ०.०३८ | ०.०३८ | ०.०३७ |
| २०१९–२०२० (सप्टेंबर २०१९ अखेर) | ०.०१२ | ०.०१२ | ०.०१२ |

## दारिद्र्य रेषेवरील केशरी (APL) ए.पी.एल. शिधापत्रिका धारकांना सवलतीच्या दराने साखर देणेबाबत

(१) केंद्र शासनाच्या दि. १ जून, २०१७ च्या मार्गदर्शक सूचनेनुसार फक्त अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांसाठीच प्रती कुटुंब १ किलो याप्रमाणे साखर वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्र शासनाचा सदर निर्णय उशीरा प्राप्त झाल्यामुळे राज्य शासनाकडून अंत्योदय अन्न योजना तसेच दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांना पूर्वी प्रमाणेच माहे एप्रिल २०१७ ते जून २०१७ या कालावधीत ई-लिलावाद्वारे साखर ऑन लाईन खरेदी करून वाटप करण्यात आले आहे.

(२) दिनांक १ मार्च, २००२ पासून केंद्र शासनाने नियंत्रित साखरेच्या किरकोळ विक्री दरात रुपये १३.२५ वरून रुपये १३.५० प्रति किलो अशी वाढ केली आहे. सद्या शासन निर्णय क्रमांक-साखर-१११६/प्र.क्र. ६९/नापु-१९, दिनांक १५ एप्रिल, २०१७ नुसार साखरेचे किरकोळ विक्री दर रु. १५.०० प्रति किलो करण्यात आले. दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार रु. १५ ऐवजी रु. २० प्रति किलो करण्यात आले आहे.

## ३.९ (ब) केरोसिनचे वाटप व वितरण :

(१) केंद्र शासनाकडून माहे एप्रिल, २०१५ पासून राज्यास दरमहा ५२,१८८ कि. लि. इतके केरोसिन नियतन प्राप्त होत होते. माहे मार्च, २०१६ पासून त्यात ५ टक्के कपात करून ४९,५८० कि. लि. केरोसिन नियतन उपलब्ध करून दिले आहे. माहे जुलै, २०१६ पासून केंद्र शासनाने सदर नियतनात ५ टक्के कपात करून राज्यास दरमहा ४७,१०० कि. लि. इतके केरोसिन नियतन उपलब्ध करून दिले आहे. माहे ऑक्टोबर, २०१६ पासून केंद्र शासनाने सदर नियतनात ३ टक्के कपात करून राज्यास दरमहा ४५,६०० कि. लि. इतके केरोसिन नियतन उपलब्ध करून दिले आहे. माहे एप्रिल, २०१७ पासून केंद्र शासनाने सदर नियतनात २८ टक्के कपात करून राज्यास दरमहा सुमारे ३२,८८० कि. लि. इतके केरोसिन नियतन उपलब्ध करून दिले आहे. माहे ऑक्टोबर, २०१७ पासून सदर नियतनात पुनःश्च ५ टक्के कपात करून राज्यास दरमहा ३१,६३२ कि. लि. इतके केरोसिन नियतन उपलब्ध करून दिले आहे. राज्य शासनाने केरोसिन नियतनात स्वैच्छिक कपात केल्यामुळे राज्यास माहे एप्रिल, २०२० पासून तिमाही ११,६३२ कि. लि. (दरमहा ३८७७ कि. लि.) नियतन प्राप्त होत होते. केंद्र शासनाने सदर नियतनात एप्रिल, २०२१ पासून ४,६४८ कि. लि. इतकी कपात केली तर एप्रिल, २०२२ पासून २,८०३ कि. लि. एवढी कपात केली तसेच माहे एप्रिल, २०२३ पासून २३१६ कि. लि. इतकी कपात केली असून सद्यःस्थितीत राज्यास तिमाही १,८७२ (दरमहा ६२४ कि. लि.) एवढे नियतन प्राप्त होत आहे. एप्रिल, २०१५ पासून राज्यास प्राप्त होणारे केरोसिन नियतन पुढील प्रमाणे आहे.

**सन २०१५-२०१६ ते २०२१-२०२२ पर्यंत केरोसिनचे प्राप्त झालेले नियतन (कि.लि.)**

| वर्ष ... | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नियतन ... | ६२११९२ | ५६३६४० | ३८४६९६ | ३१४७३६ | १४४५२८ | ४६५२८ | २७९३६ | १६७५२ | ५६१६ |

(डिसेंबर २०२३ पर्यंत)

(२) केंद्र शासनाकडून केरोसिनचे नियतन तेल कंपनी निहाय मिळते. राज्यातील जिल्हानिहाय केरोसिनची गरज व राज्यास गरजेच्या तुलनेत प्राप्त झालेले नियतन विचारात घेऊन, जिल्हानिहाय केरोसिनचे वाटप करण्यात येते.

(३) राज्यास केरोसिनचा पुरवठा भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड, हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड आणि इंडियन ऑईल कार्पोरेशन लिमिटेड या तीन तेल कंपन्यांमार्फत होतो. तेल कंपन्यांना जिल्हानिहाय नियतन कळविल्यानंतर, तेल कंपन्या त्यांच्या विभागीय/प्रादेशिक कार्यालयांना दरमहा वितरीत करावयाचा कोटा कळवितात. जिल्हाधिकारी, वितरक निहाय/तालुकानिहाय कोटा निश्चित करतात व तालुकानिहाय प्राप्त कोटा विचारात घेऊन, तहसिलदार किरकोळ विक्रेते/हॉकर्स यांच्या केरोसिन पुरवठ्याबाबत आदेश काढतात.

(४) केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या सूचनांप्रमाणे, राज्यात घाऊक तसेच किरकोळ केरोसिन विक्रीचे दर जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी आणि मुंबई शिधावाटप क्षेत्रात नियंत्रक, शिधावाटप संचालक, नागरी पुरवठा, मुंबई हे निश्चित करतात. सद्यःस्थितीत बृहन्मुंबई शिधावाटप क्षेत्रातील केरोसिनचे किरकोळ विक्रीचे दर रु. ७३.५७ प्रति लिटर आणि इतर जिल्ह्यात सुमारे रु. ७३.७४ ते रु. ७५.१५ प्रति लिटर या दरम्यान आहेत.

(५) शासनाने दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यात शहरी व ग्रामीण भागात एकरुप परिमाणानुसार केरोसिनचे वितरण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार, दिनांक २० ऑगस्ट, २०१५ पासून पुढील परिमाणानुसार केरोसिनचे वाटप करण्यात येत आहे—

| अ. क्र. | शिधापत्रिकेवरील व्यक्तींची संख्या | रॉकेल (लिटर) |
|---|---|---|
| १. | एक व्यक्ती | २ लिटर |
| २. | दोन व्यक्ती | ३ लिटर |
| ३. | तीन व्यक्ती व त्याहून अधिक व्यक्ती | ४ लिटर |

● दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार सर्व गॅस जोडणी शिधापत्रिकाधारकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत केरोसिन मिळण्यास अपात्र ठरविण्यात आले आहे.

(६) **केरोसिन परवानाधारकांचे कमिशन :** सद्यःस्थितीत घाऊक केरोसिन परवानाधारकांना शासन निर्णय, दिनांक ६ मार्च, २०१९ अन्वये मंजूर करण्यात येणारे तसेच किरकोळ/हॉकर्स व अर्धघाऊक केरोसिन परवानाधारकांना शासन निर्णय, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये मंजूर करण्यात येणारे कमिशन खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | घाऊक परवानाधारक | रु. १३४१.८८ प्रती कि. ली. |
| २. | अर्धघाऊक परवानाधारक | रु. ३००.०० प्रती कि. ली. |
| ३. | किरकोळ/हॉकर्स परवानाधारक | रु. ६७५.०० प्रती कि. ली. |

(७) राज्याला मिळणारे केरोसिन सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे पात्र लाभार्थ्यांना उपलब्ध होणे अत्यावश्यक आहे, याची शासनाला जाणीव आहे. सदर केरोसिनचा गैरवापर होऊ नये यासाठी शासनाने पुढीलप्रमाणे उपाययोजना केलेल्या आहेत—

१. सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत देण्यात येणारे केरोसिन निळ्या रंगाचे करण्यात आले, ज्यामुळे केरोसिनची अफरातफर ओळखणे सोपे जाते.

२. राज्यात सर्वत्र सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील केरोसिनचे वाटप केवळ शिधा/पुरवठापत्रिकेवर करण्यात येत आहे. यासाठी ज्यांचेकडे शिधा/पुरवठापत्रिका नाहीत त्यांना शिधा/पुरवठापत्रिका देण्याच्या आणि ज्या गावात किरकोळ विक्रेते नाहीत तेथे किरकोळ विक्रेत्यांची नियुक्ती करण्याच्या सूचना सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत.

३. सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत वितरीत होणारे केरोसिन केवळ बिगर गॅसजोडणी शिधापत्रिकाधारकांनाच प्राप्त व्हावे यास्तव दि. ०१-०८-२०१८ पासून शिधापत्रिकाधारकांकडून गॅसजोडणी नसल्याबाबतचे हमीपत्र घेऊनच केरोसिन वितरीत करण्यात येत आहे.

४. किरकोळ विक्रेत्यांनी केरोसिन वाहतूक करतांना परस्पर विल्हेवाट लावू नये, याकरिता द्वारपोच योजनेंतर्गत जिल्ह्यातील कमीत कमी ५० टक्के गावातील किरकोळ वितरकांच्या व्यवसायाच्या ठिकाणापर्यंत केरोसिन पोहोचविण्याच्या सूचना देण्यात आलेल्या असून त्यानुसार अंमलबजावणी सुरु आहे.

राज्यात घरगुती एल.पी.जी. जोडणीधारकांची एकूण संख्या ३,४४,३७,२०८ असून त्यापैकी एक सिलिंडर जोडणीधारक १,७८,८७,४६९ इतके असून दोन सिलिंडर जोडणीधारकांची संख्या १,६५,४९,७३९ इतकी आहे.

## ३.१० (क) पेट्रोलजन्य पदार्थ :

**(अ) पेट्रोल आणि डिझेल :** पेट्रोल व डिझेल या पेट्रोलियम पदार्थांचे वितरण व नियंत्रण याबाबत केंद्र शासनाकडून धोरणात्मक आदेश पारीत करण्यात येतात. पेट्रोल व डिझेल केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार तेल कंपन्यांनी नेमलेल्या वितरकांमार्फत ग्राहकांना वितरीत करण्यात येते. केंद्र शासनाने पेट्रोल व डिझेल नियमित व पुरेशा प्रमाणात उपलब्ध होण्यासाठी व त्यामधील होणाऱ्या गैरप्रकारास आळा घालण्यासाठी Motor Spirit and High Speed Diesel (Regulation of Supply and Distribution and Prevention of Malpractices) Order, 2005 पारीत केलेले आहेत. उक्त आदेशांतर्गत राज्य शासनाच्या राजपत्रित अधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्यात आले असून, त्यांना तपासणी व जप्तीचे अधिकार देण्यात आलेले आहेत.

**(ब) नाफ्ता :** केंद्र शासनाने पेट्रोल/डिझेल मध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी काही पेट्रोलियम पदार्थ/उपपदार्थांच्या वापरावर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने, नाफ्ता (ॲक्वीजिशन, स्टोरेज, सेल ॲण्ड प्रिव्हेन्शन ऑफ युज इन ऑटोमोबाईल्स) ऑर्डर, २००० हे आदेश पारीत केले आहेत. या अनुषंगाने नाफ्ता, वापर, संपादन, साठवणूक व विक्री करणाऱ्या सर्व संबंधितांना यासंदर्भात अनुज्ञप्ती घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. यास अनुसरुन राज्य शासनाने दिनांक १४ जानेवारी, २००९ रोजी "महाराष्ट्र नाफ्ता (अनुज्ञापन) आदेश, २००९" हे आदेश निर्गमित केले आहेत.

**(क) सॉल्वंट :** दि सॉल्वंट, रॅफीनेट ॲण्ड स्लॉप (ॲक्वीजिशन, स्टोरेज, सेल ॲण्ड प्रिव्हेन्शन ऑफ युज इन ऑटोमोबाईल्स) ऑर्डर, २००० हे आदेश पारीत केले आहेत. या अनुषंगाने सॉल्वंट, रॅफीनेट व स्लॉप इ. पेट्रोलियम उपपदार्थांचे संपादन, साठवणूक व विक्री करणाऱ्या सर्व संबंधितांना यासंदर्भात अनुज्ञप्ति घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. यास अनुसरुन राज्य शासनाने, दिनांक २५ जानेवारी, २००७ रोजी "दि महाराष्ट्र सॉल्वंट, रॅफीनेट ॲण्ड स्लॉप (लायसन्सिंग) आर्डर, २००७" हे आदेश निर्गमित केले आहेत.

**(ड) एल. पी. जी. गॅस :** केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार तेल कंपन्या आपल्या अधिकृत वितरकांमार्फत एल. पी. जी. गॅसचा पुरवठा करीत असतात. केंद्र शासनाने एलपीजीच्या पुरवठ्यात गैरव्यवहार होऊ नये या उद्देशाने "दि लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (रेग्युलेशन ऑफ सप्लाय ॲन्ड डिस्ट्रीब्युशन) ऑर्डर, २०००" हे आदेश पारीत केले आहेत. या अंतर्गत व्यवसायाच्या ठिकाणी/साठवणुकीच्या ठिकाणी प्रवेश, तपासणी व जप्तीचे अधिकार राज्य शासनाच्या संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत.

राज्यात घरगुती एल. पी. जी जोडणीधारकांची एकूण संख्या ३,३४,०७,२४६ असून त्यापैकी एक सिलिंडर जोडणीधारक १,७८,०४,६०८ इतके असून दोन सिलिंडर जोडणीधारकांची संख्या १,५६,०२,६३८ इतकी आहे. केंद्र शासनाने प्रत्येक एल. पी. जी. ग्राहकाकरिता अनुदानित एल. पी. जी. सिलिंडरची संख्या १२ इतकी सिमित केली आहे.

**एलपीजी ग्राहकांसाठी मॉडीफाईड डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर योजना :** देशातील ५४ जिल्ह्यांमध्ये दिनांक १५ नोव्हेंबर, २०१४ पासून मॉडीफाईड डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर फॉर एल. पी. जी. (MDBTL) स्कीम सुरु करण्यात आली असून महाराष्ट्रातील वर्धा व अमरावती या दोन जिल्ह्यांत ही योजना लागू झाली आहे. राज्यातील उर्वरित जिल्ह्यांमध्ये ही योजना दिनांक १ जानेवारी, २०१५ पासून लागू करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत एल.पी.जी ग्राहक आधार क्रमांक व बँक खाते क्रमांक हे एल.पी.जी ग्राहक क्रमांकाशी संलग्न करून अनुदान प्राप्त करून घेता येते.

## ३.११ सार्वजनिक वितरण व्यवस्था बळकट होण्याकरिता करण्यात आलेल्या उपाययोजना :–

सार्वजनिक वितरण व्यवस्था बळकट करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने शिधावाटप/रास्तभाव दुकांनाची नियमित, आकस्मिक तपासणी करणे, अन्नधान्याचे नमुने पॉलीथीन पिशव्यामधून प्रदर्शित करणे व त्याची पडताळणी करणे, अशा विविध उपाययोजना केल्या आहेत.

**३.११.१** जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये साठेबाजी व काळाबाजार करणाऱ्या व्यक्तींवर माहे नोव्हेंबर, २०२२ ते ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत राज्यात घातलेल्या धाडी, अटक करण्यात आलेल्या व्यक्तींची संख्या, पोलीसांकडे नोंदविलेले गुन्हे तसेच जप्त करण्यात आलेल्या वस्तूंची किंमत दर्शविणारे विवरणपत्र.

**विवरणपत्र**

| महिना | घातलेल्या धाडींची संख्या | अटक करण्यात आलेल्या व्यक्तींची संख्या | आरोपपत्र दाखल केलेल्या व्यक्तींची संख्या | जप्त करण्यात आलेल्या मालाची किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|
| नोव्हेंबर, २०२२ | ५४ | ९९ | ९४ | ५७६३९५८ |
| डिसेंबर, २०२२ | ५१ | ८१ | ११६ | ७०००४९४ |
| जानेवारी, २०२३ | ४१ | ५६ | १२३ | २१५३५२८३ |
| फेब्रुवारी, २०२३ | ४३ | ४९ | ९६ | ७६५४१६१ |
| मार्च, २०२३ | ५५ | ७२ | ११४ | ३८९१२४४ |
| एप्रिल, २०२३ | ४४ | ५० | ११२ | १११२०४९९ |
| मे, २०२३ | ४० | ५२ | १११ | ५०८५९६८ |
| जून, २०२३ | ४५ | ६२ | ६ | ५६८९९४६ |
| जुलै, २०२३ | ५९ | ९७ | ९ | १५३५८४५६ |
| ऑगस्ट, २०२३ | ५८ | ९७ | २० | ५०२०३६८७ |
| सप्टेंबर, २०२३ | ३९ | ५४ | ७ | ६२०३८५५ |
| ऑक्टोबर, २०२३ | ६० | ८० | १६ | १००६८६९३ |
| एकूण ... | ५८९ | ८४९ | ८२४ | १४९५७६२४४ |

जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत माहे नोव्हेंबर, २०२२ ते ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत राज्यात एकूण ५८९ छापे घालण्यात आले व रुपये १४,९५,७६,२४४ इतका माल जप्त करण्यात आला आहे. आरोपपत्र दाखल केलेल्या व्यक्तींची संख्या ८२४ आहे व अटक करण्यात आलेल्या व्यक्तींची संख्या ८४९ इतकी आहे. वरील सर्व माहिती पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, सांख्यिकी शाखा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून प्राप्त माहितीनुसार दिली आहे.

**३.११.२ गरीब व गरजू व्यक्तींना स्वस्त दरात शिवभोजन उपलब्ध करून देण्याबाबत :–**

राज्यातील गरीब व गरजू जनतेला सवलतीच्या दरात भोजन उपलब्ध करून देण्याची योजना शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने पहिल्या टप्प्यात प्रायोगिक तत्वावर तिमाहीसाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्यालयी एक भोजनालय सुरु करण्यात येईल. तद्नंतर सदरील योजनेस मिळणारा प्रतिसाद पाहून ही योजना इतर भागात राबविण्यात येईल.

**राज्यात स्वस्त दरात शासकीय अनुदान प्राप्त भोजनालयातून भोजन उपलब्ध करून देण्याची योजना :–**

१. या योजनेअंतर्गत सुरु करण्यात येणाऱ्या भोजनालयात २ चपात्या, १ वाटी भाजी, १ मूद भात व १ वाटी वरण समाविष्ट असलेली जेवणाची थाळी रु. १०/- प्रती थाळी याप्रमाणे भोजन उपलब्ध करून देण्यात येईल.

२. भोजनालय चालविण्यासाठी सद्यःस्थितीत सुरु असलेल्या खानावळ, महिला बचतगट, भोजनालय, रेस्टॉरंट अथवा मेस यापैकी सदर योजना राबविण्यास सक्षम असलेल्या भोजनालयाची त्या-त्या स्तरावरील समितीने निवड करावी. तसेच ज्या-ज्या ठिकाणी गरीब किंवा मजूर लोकांची वर्दळ जास्त असेल अशा ठिकाणी (उदा. जिल्हा रुग्णालये, बस स्थानके, रेल्वे स्थानक परिसर, बाजारपेठा, शासकीय कार्यालये इत्यादी) सदर थाळीची विक्री केली जाईल, याबाबतची दक्षता संबंधित समितीची राहील.

३. सदर योजनेचे स्वरुप पुढील प्रमाणे राहील :– सदर थाळीची किंमत शहरी भागामध्ये प्रतिथाळी रु. ५०/- व ग्रामीण भागामध्ये रु. ३५/- इतकी राहील. समितीने पात्र ठरविलेल्या खानावळ, महिला बचतगट, भोजनालय, रेस्टॉरंट अथवा मेस यांना प्रति ग्राहकांकडुन प्राप्त झालेल्या रु. १०/- एवढ्या रकमेव्यतीरिक्त उर्वरित रक्कम अनुदान म्हणून या विभागाकडून थेट जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येईल व त्यांच्यामार्फत संबंधितांना वितरित करण्यात येईल.

४. सदर योजनेवर संनियंत्रण ठेवण्यासाठी राज्यस्तरावर पुढील प्रमाणे उच्चाधिकार समिती असेल.

| | |
|---|---|
| मा. मुख्य सचिव | अध्यक्ष |
| मा. अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) | सदस्य |
| मा. प्रधान सचिव (नगर विकास विभाग) | सदस्य |
| मा. प्रधान सचिव (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग) | सदस्य सचिव |

सदर समिती सर्व पर्यायांचा सांगोपांग विचार करून या योजनेचा पुढील टप्पा ठरविण्याची कारवाई करेल. या पर्यायांमध्ये सेंट्रल किचन, नामवंत स्वयंसेवी संस्था, सार्वजनिक न्यास व CSR आणि VSTF इत्यादींचा सहभाग कसा घेता येईल व शासनाच्या सहभागाबद्दल रुपरेषा ठरवेल. त्याचप्रमाणे ही योजना शाश्वत व टिकणारी होण्यासाठी सदर समिती क्रॉस सबसिडी व सार्वजनिक-खाजगी भागीदारी चे तत्व (PPP) वापरण्यावर भर देईल. तसेच याकरिता राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतील प्राधान्य कुटुंबांच्या त्या शहरातील/जिल्हा मुख्यालयातील लाभार्थ्यांच्या प्रमाणात थाळींचे प्रमाण ठरवण्यात येईल. याबाबतचा निर्णय वरील उच्चाधिकार समिती घेईल.

५. सदर योजना राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्यालयी १ भोजनालय या प्रमाणे प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात येत असल्याने सदर योजनेस अंदाजित एकूण तिमाही खर्च प्रति थाळी रु. ४०/- अनुदान याप्रमाणे एकूण रु. ६,४८,००,०००/- (६ कोटी ४८ लक्ष रुपये) [ एकूण थाळी ५०० x ३६ (सर्व जिल्हे) x अनुदान रु. ४० (प्रति थाळी) x ९० दिवस ] इतका अपेक्षित आहे.

# रास्त भाव दुकानांच्या तपासण्या व त्यावर केलेल्या कारवाईबाबत तक्ता

## रास्त भाव दुकानांच्या तपासण्या व

माहे जानेवारी २०१९

| अ. क्र. | जिल्हा | | कार्यरत रास्त भाव दुकानांची संख्या | आवश्यक तपासण्या | नियमित तपासण्याची संख्या | टक्केवारी | आकस्मिक तपासण्याची संख्या | तक्रार प्राप्त झाल्यामुळे तपासण्याची संख्या | एकूण तपासण्या (५+७+८) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १. | मुंबई/ठाणे | ... | २८२४० | ६२७ | ५३६३ | ५४ | ४१ | १३३ | ५६९७ |
| २. | ठाणे | ... | ५२४ | २६२ | ४० | ... | ... | ... | ४० |
| ३. | पालघर | ... | ८४८ | ४२४ | ३५ | ... | ... | ... | ३५ |
| ४. | रायगड | ... | १२७० | ६३५ | ९६ | १ | ... | ... | ९६ |
| ५. | रत्नागिरी | ... | ८४७ | ४२४ | ७१ | ... | ... | ... | ७१ |
| ६. | सिंधुदुर्ग | ... | ३८२ | १९१ | ४० | ... | ... | ... | ४० |
| ७. | नाशिक | ... | २६०९ | १३०५ | २३६ | २ | ८ | ... | २३६ |
| ८. | अहमदनगर | ... | १८८४ | २४२ | २७८ | ३ | ... | ... | २७८ |
| ९. | जळगाव | ... | १९३६ | ९६८ | २३७ | २ | ... | १ | २३८ |
| १०. | धुळे | ... | ९८० | ४९० | ८७ | १ | ६ | ... | ८७ |
| ११. | नंदुरबार | ... | १०६१ | ५३१ | ४८ | ... | ७ | २ | ५० |
| १२. | औरंगाबाद | ... | १८०२ | २०१ | १५० | २ | १३ | ७ | १६७ |
| १३. | जालना | ... | ३०९१ | १५४६ | १०९ | १ | ... | ... | १०९ |
| १४. | नांदेड | ... | १९८८ | ९९४ | १३२ | १ | ३ | ... | १३२ |
| १५. | बीड | ... | १९६४ | ९८२ | १०२ | १ | ३० | ... | १११ |
| १६. | उस्मानाबाद | ... | १०७३ | ५३७ | ४०५ | ४ | ... | ... | ४०५ |
| १७. | परभणी | ... | ११८३ | ५९२ | १६३ | २ | २५ | १ | १६४ |
| १८. | लातूर | ... | १३५० | ६७५ | १८२ | २ | १ | ... | १८४ |
| १९. | हिंगोली | ... | ७९६ | ३९८ | १३२ | १ | ११ | ९ | १५९ |
| २०. | पुणे (ग्रा.) | ... | १८०४ | ९०२ | २९५ | ३ | २५ | ... | २९८ |
| २१. | पुणे (श.) | ... | ८०७ | ४०४ | ३१६ | ३ | २ | १ | ३१७ |
| २२. | सोलापूर (ग्रा.) | ... | १५५८ | ७७९ | २४९ | २ | २ | ... | २५१ |
| २३. | सोलापूर (श.) | ... | ३१५ | १५८ | ७३ | १ | ... | ... | ७३ |
| २४. | कोल्हापूर | ... | १५८१ | ७९१ | २५३ | ३ | १ | ... | २५३ |
| २५. | सातारा | ... | १६७७ | ८३९ | १४० | १ | ३ | ... | १४३ |
| २६. | सांगली | ... | १३५६ | ६७८ | ७० | १ | ... | ... | ७० |
| २७. | अमरावती | ... | १९१४ | २५७ | ६३ | १ | १ | ... | ६४ |
| २८. | वाशिम | ... | ७७५ | ३८८ | ४९ | ... | १० | ... | ४९ |
| २९. | अकोला | ... | १०६० | ५३० | ५४ | ... | ३ | ... | ५६ |
| ३०. | बुलढाणा | ... | १५३७ | ७६९ | १८२ | २ | २ | २ | १८३ |
| ३१. | यवतमाळ | ... | २०५३ | १०२७ | १२८ | १ | ४ | ... | १२९ |
| ३२. | नागपूर (श.) | ... | ६६७ | ३३४ | १०७३ | ११ | १२ | ३६ | ११९० |
| ३३. | नागपूर (ग्रा.) | ... | १२९३ | ६४७ | १५५८ | १६ | ३ | ४० | १६०४ |
| ३४. | वर्धा | ... | ८५० | ४२५ | ८४३ | ८ | २ | ३१ | ८८३ |
| ३५. | भंडारा | ... | ८९३ | ४४७ | ८१५ | ८ | १ | ८ | ८३१ |
| ३६. | गोंदिया | ... | ९९८ | ४९९ | १०२४ | १० | २ | १९ | १०६३ |
| ३७. | चंद्रपूर | ... | १५२८ | ७६४ | १४०२ | १४ | ६ | ३७ | १४८५ |
| ३८. | गडचिरोली | ... | ११९६ | ५९८ | ११४० | ११ | ... | २ | ११४२ |
| | एकूण | ... | ७७६९० | ३८८४५ | १७६३३ | १७६ | २२६ | ३२९ | १८३८३ |

**त्यावर केलेल्या कारवाईबाबत**

ते सप्टेंबर २०१९

| एकूण तपासण्याची टक्केवारी | दोषी आढळून आलेल्या दुकानांची संख्या | | | केलेली कारवाई | | | जप्त मुद्देमालाची किंमत रुपये | गुन्हे दाखल केलेल्या व्यक्तींची संख्या | अटक केलेल्या व्यक्तींची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | किरकोळ दोष | मध्यम दोष | गंभीर दोष | निलंबित दुकाने | रद्द दुकाने | वसूल दंड रुपये | | | |
| १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| ५७ | ३९५ | ३८४ | २७ | ५१ | ४२ | २८४६४७१ | ६४२०६ | १५ | १२ |
| ४ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३ | ... | ... | २ | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ९ | ... | २ | ... | ८ | ... | ४००० | ... | ... | ... |
| ६ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ४ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २१ | १९ | ... | ... | २ | ... | ... | ... | ... | ... |
| २५ | १५० | १०० | ... | ... | १ | ... | ... | ... | ... |
| २१ | ... | ११ | ... | ११ | ... | ... | ... | ... | ... |
| ८ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ५ | ४६ | ... | ... | ... | ... | १३००० | ... | ... | ... |
| १५ | १ | १ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १० | ... | ... | ... | ... | ... | ५००० | ... | ... | ... |
| १२ | ३ | १ | ... | ... | ... | १००० | ... | ... | ... |
| १० | ... | २ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३६ | ... | ... | ९ | ९ | ... | ... | ... | ... | ... |
| १५ | १० | ३ | १ | १ | ... | ... | ... | ... | ... |
| १७ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १४ | ... | ... | ... | ... | ... | १६४००० | ... | ... | ... |
| २७ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २९ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २३ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ७ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २३ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १३ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ६ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ६ | १ | ... | ... | ... | ... | १००० | ... | ... | ... |
| ४ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ५ | १ | २ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १६ | ... | २ | ... | २ | ... | २००० | ... | ... | ... |
| १२ | ... | १ | ... | ... | ... | १५०० | ... | ... | ... |
| १०७ | ४६ | १ | २ | २ | ... | ४६४२७ | ... | ... | ... |
| १४४ | १५ | ... | ... | ... | ४ | ९००० | ८३५४ | ... | ... |
| ७९ | ३१ | ... | ९ | १५ | ... | ३७०६५ | ... | ... | ... |
| ७५ | ८ | ८ | ... | २ | १ | १८००० | ... | ... | ... |
| ९६ | २ | ३ | ५ | ... | ५ | १७००० | ७४८ | ... | ... |
| १३४ | ५८ | १९ | ८ | ७ | १ | ५१५०० | ... | ... | ... |
| १०३ | ५ | ४ | १ | २ | १ | २००० | ... | ... | ... |
| १६५४ | ७९१ | ५४४ | ६४ | ११२ | ५५ | ३२१८९६३ | ७३३०८ | १५ | १२ |

## ३.१२ (अ) भात गिरणी उद्योग :

केंद्र शासनाने निर्णय घेऊन भातगिरणी उद्योग (विनियमन) अधिनियम, १९५८ व भात गिरणी उद्योग (विनियमन करणे व अनुज्ञप्ती देणे) नियम, १९५९ हे दोन्ही अधिनियम त्यांच्या असाधारण राजपत्र-२, खंड-१ च्या दिनांक २५-५-९७ च्या अधिसूचनेनुसार रद्द **(Repeal)** केले आहेत. त्यामुळे भात गिरणी उद्योगासाठी लागणारा परवाना/अनुज्ञप्ती यावर राज्य शासनाचे निर्बंध राहिलेले नाहीत. केंद्र शासनाची सदरील अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात भाग-४ क मध्ये दिनांक ८-७-१९९७ रोजी पुनःप्रकाशीत करण्यात आली आहे.

## ३.१३ ग्राहक संरक्षण–

ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ दि. २०-०७-२०२० पासून लागू झाला असून तत्पूर्वीचा ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ व्यपगत झाला आहे. ग्राहकांचे हिताचे संरक्षण करण्याच्या हेतूने समयोचित व प्रभावी प्रशासनासाठी आणि ग्राहकांच्या विवादाचे निवारणासाठी केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरण स्थापित करणेची तरतूद या अधिनियमामध्ये करण्यात आली आहे. या अधिनियमान्वये मोबदला अदा करून कोणतीही वस्तू किंवा सेवा Online किंवा Offline पद्धतीने घेणारी व्यक्ती ही "ग्राहक" समजली जाते. या अधिनियमामध्ये मध्यस्थी कक्ष, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती, उत्पादनाचे उत्तरदायित्व, ई-कॉमर्स/ इलेक्ट्रॉनिक सेवा प्रदाता/थेट विक्री, केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरण इत्यादी बाबत तरतुदी नव्याने समाविष्ट करण्यात आल्या आहेत. या अधिनियमामध्ये राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हा पातळीवर ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या स्थापनेची तरतूद आहे. सदर आयोग पूर्णतः ग्राहक विवादाचे निराकरण करण्यासाठी स्थापन करण्यात आले असून त्यांचे केंद्र अधिसूचना दि. ३१ डिसेंबर, २०२२ अन्वये न्यायक्षेत्र सुधारणा करण्यात आली आहे.

(१) राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोग :- राष्ट्रीय पातळीवर (रु. २ कोटीपेक्षा अधिकचे दावे)

(२) राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग :- प्रत्येक राज्य स्तरावर (रु. ५० लक्ष ते रु. २ कोटीपर्यंतचे दावे)

(३) जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग :- प्रत्येक जिल्हा स्तरावर (रु. ५० लक्ष पर्यंतचे दावे)

राज्य आयोगाचे मुख्यालय मुंबई येथे असून औरंगाबाद आणि नागपूर या दोन ठिकाणी प्रादेशिक खंडपीठे कार्यरत आहेत आणि कोल्हापूर, पुणे, अमरावती आणि नाशिक येथे राज्य आयोगाचे परिक्रमा खंडपीठे स्थापन करण्यात आली आहेत. जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी एकूण ४० जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग कार्यान्वित आहेत.

## राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समिती–

राज्यात ग्राहक चळवळीला प्रोत्साहन देऊन ही चळवळ ग्रामीण भागात पसरविण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेसंबंधात शासनाला सल्ला देण्यासाठी दिनांक १० मे, २००१ च्या शासन निर्णयान्वये एक सदस्यीय "राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समिती" स्थापन करण्यात आली होती. या समितीच्या आस्थापनेवर दिनांक १८-०६-२००२ च्या शासन निर्णयान्वये एकूण ८ पदे निर्माण करण्यात आली होती त्यापैकी १ पद सद्यःस्थितीत कार्यरत असून दोन पदे व्यपगत झाली आहेत.

### ३.१३.१ राज्य ग्राहक संरक्षण परिषद :—

राज्यातील ग्राहकांच्या हिताचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ अनुसार राज्य ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. मा. मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग) हे या परिषदेचे अध्यक्ष असून शासकीय सदस्य २५, अशासकीय सदस्य १७ आणि केंद्र शासनाचे प्रतिनिधी १० असे एकूण ५२ सदस्य आहेत. या परिषदेचा कालावधी ३ वर्षाचा आहे.

### ३.१३.२ जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद :—

जिल्हास्तरावरील ग्राहकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना दि. २३-११-२०२२ अन्वये करण्यात आली आहे. याची एकूण सदस्य संख्या ४२ असून त्यामध्ये १४ शासकीय सदस्य व २८ अशासकीय सदस्यांचा समावेश आहे. जिल्हाधिकारी हे जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे अध्यक्ष आहेत. जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची मुदत तीन वर्षे इतकी आहे.

### ३.१३.३ राज्य ग्राहक हेल्पलाईन :—

ग्राहकांना विनाशुल्क टेलीफोनद्वारे (टोल फ्री हेल्पलाईन) त्यांच्या समस्येबद्दल सल्ला/मार्गदर्शन मिळण्यासाठी राज्य ग्राहक हेल्पलाईन सुरु करण्यात आली आहे. या हेल्पलाईनद्वारे राज्यातील ग्राहकांना मराठी, इंग्रजी व हिंदी भाषेमध्ये सल्ला उपलब्ध होत आहे. राज्य ग्राहक हेल्पलाईनचा **टोल फ्री क्र. १८००२२२२६२** असा आहे.

## ४. कार्यक्रम क्रमांक ३ : वजने व मापे यांचे विनियमन–

### ४. वैधमापनशास्त्र यंत्रणा :—

वजने व मापे यंत्रणेस आता वैधमापनशास्त्र हे नवीन नामाभिधान देण्यात आले असून ही यंत्रणा अन्न, व नागरी पुरवठा विभागाचे एक महत्वाचे अंग आहे. अचूक वजन मापाचा वापर असणे वजन व मापात वस्तु कमी देणाऱ्या लबाड व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या पिळवणुकीपासून ग्राहकांचे हित संरक्षण करणे हा या यंत्रणेचा मुख्य उद्देश आहे. तसेच आवेष्टित वस्तू ग्राहकांना योग्य भावात वजन मापात मिळतील याची खात्री करून देणे व जादा किंमत आकारणाऱ्या व्यापाऱ्यांविरुद्ध कारवाई करणे हाही या यंत्रणेचा उद्देश आहे.

**४.१** वजने मापे हा विषय सामाजिक यादीवर असून त्याबाबतचे अधिनियम व नियम केंद्र सरकारने बनविले आहेत व त्यांची अंमलबजावणी राज्य सरकारच्या वैधमापनशास्त्र यंत्रणेमार्फत केली जाते. त्या अनुषंगाने संसदेने वैद्य मापन शास्त्र अधिनियम, २००९, पारित केला आहे आणि तद्नुषंगाने खालीलप्रमाणे नियम तयार केले असून ते सर्व नियमही अंमलात आलेले आहेत.

(१) वैधमापनशास्त्र (आवेष्टित वस्तू) नियम, २०११.

(२) वैधमापनशास्त्र (सर्वसाधारण) नियम, २०११.

(३) वैधमापनशास्त्र (नमुना संमती) नियम, २०११.

(४) वैधमापनशास्त्र (संख्यांकन) नियम, २०११.

(५) वैधमापनशास्त्र (राष्ट्रीय मानके) नियम, २०११.

(६) भारतीय वैधमापनशास्त्र संस्था नियम, २०११.

या अधिनियमाची व नियमांची एकसूत्री अंमलबजावणी व्हावी म्हणून संसदेने वैधमापनशास्त्र (अंमलबजावणी) अधिनियम, २००९ पारित केला आहे. हा अधिनियम व त्या अंतर्गत बनविलेले महाराष्ट्र वैधमापनशास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ याची अंमलबजावणी दिनांक २८-४-२०११ पासून करण्यात येत आहे.

**४.२** नियंत्रक, वैधमापनशास्त्र, महाराष्ट्र राज्य हे या यंत्रणेचे विभाग प्रमुख असून वरील अधिनियम व नियम यांच्या मार्गदर्शनाखाली अंमलबजावणीचे काम करण्यात येते. वरील अधिनियम व नियम यांची रितसर अंमलबजावणी होण्यासाठी नियंत्रक, वैधमापणशास्त्र यांना सहाय्य करण्यासाठी त्यांच्या नियंत्रणाखाली राज्यस्तरावर एक उपनियंत्रक, विभागीय स्तरांवर प्रत्येकी उपनियंत्रक (८), जिल्हास्तरावर प्रत्येकी सहायक नियंत्रक (४६) आणि तालुकास्तरावर निरीक्षक (२८२) असा अधिकारी वर्ग आहे.

**४.३** निरीक्षक, वैधमापनशास्त्र म्हणून नियुक्ती झाल्यानंतर त्यांना भारतीय वैधमापनशास्त्र संस्था, रांची, (झारखंड) येथे चार महिन्यांचे सखोल मूलभूत प्रशिक्षण दिले जाते.

**या यंत्रणेची मुख्य कामे खालीलप्रमाणे आहेत :-**

(एक) कोणत्याही व्यवहारात, औद्योगिक उत्पादनासाठी किंवा सुरक्षेसाठी उपयोगात आणलेल्या किंवा उपयोगात आणण्याचा उद्देश असलेल्या प्रत्येक वजने, मापे, तोलन आणि मापन उपकरणांची अचूकतेसाठी पडताळणी व मुद्रांकन,

(दोन) उपरोक्त अधिनियम व नियम यातील तरतुदींचा भंग करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कारवाई,

(तीन) आवेष्टित वस्तूंच्या व्यापारात रास्तभाव आणि उचित व्यापार प्रथा प्रस्थापित करण्यासाठी आंतरराज्य आणि राज्यांतर्गत विकल्या जाणाऱ्या आवेष्टित वस्तुसंबंधीच्या व्यवहारात आवेष्टित वस्तु नियमांतर्गत तरतुदींची अंमलबजावणी,

(चार) वजने, मापे, तोलन आणि मापन उपकरणांसाठी उत्पादन, विक्री व दुरूस्तीकरीता परवाने देणे आणि त्यांचे नुतनीकरण करणे इ.

**४.४** या यंत्रणेमार्फत खालील मार्गाने शुल्क वसूल केले जाते :–

(१) वजने मापे, तोलन आणि मापन उपकरणे यांची पडताळणी व मुद्रांकन शुल्क,

(२) गुन्हा प्रशमन शुल्क,

(३) परवाना शुल्क,

(४) आवेष्टित वस्तूंचे उत्पादन आवेष्टक/आवेष्टक (राज्यांतर्गत) यांची नोंदणी शुल्क.

ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी नियमितपणे वजन व मापांची पडताळणी वैधमापनशास्त्र यंत्रणेकडून करण्यात येते, निरीक्षक कार्यालयामार्फत वेळोवेळी तपासणी करून दोषी आस्थापनेविरूद्ध कारवाई करण्यात येते. वजन व मापे वापरून व्यवसाय करणाऱ्या सर्व आस्थापना यांनी त्यांच्याकडील वजन व मापांची नियमित पडताळणी करून मुद्रांकन करणे बंधनकारक आहे. राज्यातील वजन व मापांची नियमित पडताळणी करून मुद्रांकन करण्यासाठी नेमण्यात आलेल्या परवानाधारकांची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | परवाना | उत्पादक | विक्रेते | दुरूस्तक | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | देण्यात आलेले परवाने | २४० | ७१० | ९४० | १८९० |

**वैधमापनशास्त्र यंत्रणेतील प्रयोगशाळा :—**

वैधमापनशास्त्र यंत्रणेतील कार्यकारी व दुय्यम मानकेच्या प्रयोगशाळेच्या उभारणीसाठी केंद्र शासनाचे प्राप्त निधीमधून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे—

- औरंगाबाद व नाशिक येथे कार्यकारी मानक प्रयोगशाळेकरिता जागा विकत घेतली आहे.
- वणी व पिंपळगाव बसवंत येथे जागा विकत घेवून कार्यकारी मानक प्रयोगशाळेची इमारत बांधली.
- विटा जिल्हा सांगली येथे प्रशासकीय इमारत एक मानक प्रयोगशाळा कार्यान्वित केली आहे.
- बीड जिल्हा येथे जिल्हाधिकारी यांचेकडून मिळालेल्या इमारतीत मानक प्रयोगशाळा कार्यान्वित केली आहे.
- पुणे येथे एक दुय्यम मानक प्रयोगशाळा व पाच कार्यकारी मानक प्रयोगशाळेकरिता भूखंड विकत घेऊन इमारतीचे कामकाज करण्याकरिता कार्यवाही चालू आहे.

**पडताळणी व प्रशमन शुल्क :—**

वजने व मापे यांची वार्षिक पडताळणी व प्रशमनाद्वारे शासनास प्राप्त झालेल्या शुल्काची मागील ४ वर्षातील रक्कम खालीलप्रमाणे आहे—

(आकडे रुपये कोटीत)

| अ.क्र. | वित्तीय वर्ष | पडताळणी शुल्क | प्रशमन शुल्क | एकूण शुल्क |
|---|---|---|---|---|
| १. | २०१४-२०१५ | ३३.९१ | २०.३४ | ५४.२५ |
| २. | २०१५-२०१६ | ३३.९२ | २०.३४ | ५४.२६ |
| ३. | २०१६-२०१७ | ४०.३० | ८.३१ | ४८.६१ |
| ४. | २०१७-२०१८ | ४२.९५ | ८.४९ | ५१.४४ |
| ५. | २०१८-२०१९ | ७४.०५ | ८.६१ | ८२.६६ |
| ६. | २०१९-२०२० (ऑक्टोबर २०१९ अखेर) | ३७.४२ | ४.२२ | ४१.६४ |

**वैधमापनशास्त्र यंत्रणेतील पदांचा तपशील– (३०/९/२०१९ पर्यंत)**

| अ.क्र. | प्रवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १. | गट-अ | ९ | ५ | ४ |
| २. | गट-ब | ३२९ | २७६ | ५३ |
| ३. | गट-क | ३३६ | २७४ | ६२ |
| ४. | गट-ड | २७० | २४१ | २९ |
| | एकूण ... | ९४४ | ७९६ | १४८ |

या यंत्रणेतील नियंत्रकाचे पद भाप्रसे/भापोसे च्या सुपरटाईम स्केलमधील अधिकाऱ्यांच्या बदलाने भरण्यात येते.

नियंत्रक वैधमापनशास्त्र विभागाने स्वतंत्रपणे नागरी सनद तयार केली असून शासनाच्या मंजुरीनंतर दिनांक १९-४-२०१५ रोजी त्यास प्रसिद्धी देण्यात आलेली आहे.

(१) वजने व मापे मानके (अंमलबजावणी) अधिनियम, १९८५ व त्याखालील नियमांच्या तरतुदींची जास्त परिणामकारकरित्या अंमलबजावणी.

(२) वजने व मापे/मानके अधिनियम, १९७६ (केंद्रीय कायदा) आणि त्याखालील नियमांच्या तरतुदींची अंमलबजावणी.

वरील अधिनियम व नियम यांच्या अंतर्गत नेमून दिलेली ठळक कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत :—

(एक) वजने व मापे इत्यादींची वार्षिक पडताळणी व मुद्रांकन कार्यक्रम,

(दोन) आंतरराज्यीय आणि राज्यांतर्गत विकल्या जाणाऱ्या आवेष्टित वस्तु नियमांतर्गत तरतुदींची अंमलबजावणी,

(तीन) तेल वाहन टाक्या आणि साठवण टाक्या यांचे मापनीकरण,

(चार) नमुना मान्यता,

(पाच) वजने, मापे, तोलन आणि मापन उपकरणे इत्यादींसाठी उत्पादन, विक्री व दुरुस्ती परवाना देणे व त्यांचे नवीकरण करणे.

(सहा) आंतरराज्यीय व्यापारातील वजने व मापे यांची संदर्भीय नियमातील तरतुदींप्रमाणे पडताळणी व मुद्रांकन करणे.

(सात) सर्व निरीक्षक, वैधमापनशास्त्र यांना रांची, (झारखंड) येथील संस्थेमध्ये सखोल प्रशिक्षण देणे.

या यंत्रणेच्या तिसऱ्या टप्प्यातील विस्तार कार्यक्रमाचा प्रस्ताव विचाराधीन असून त्यात खालील कामांचा अंतर्भाव करण्याचे प्रस्तावित आहे–

(एक) टॅक्सी आणि ऑटो रिक्षामीटर्स पडताळणी व मुद्रांकन.

(दोन) क्लिनिकल थर्मामीटर्स पडताळणी व मुद्रांकन.

(तीन) वॉटर आणि विद्युतमीटर्स पडताळणी व मुद्रांकन.

(चार) गोल्ड हॉलमार्किंग.

(पाच) मोबाईल टेस्ट हॅन फॉर वे ब्रीज टेस्टिंग.

वैधमापनशास्त्र ही यंत्रणा ग्राहकांचे हित व संरक्षणाबाबत अतिशय महत्वाची भूमिका बजावत आहे. या यंत्रणेच्या कामाचा आढावा व वजने मापे पडताळणी व मुद्रांकन कामाचा तपशील परिशिष्ट–फ मध्ये देण्यात आला आहे. वैधमापनशास्त्र अधिनियम, २००९ व आवेष्टित वस्तु नियम, १९७७ खाली भरण्यात आलेले खटले इत्यादींबाबतची माहिती परिशिष्ट–ह मध्ये देण्यात आली आहे.

## (५) कार्यक्रम क्रमांक ४–लेखा परीक्षा

(अ) प्रापण वितरण व भाव नियंत्रण कार्यक्रमांतर्गत ठेवण्यात आलेल्या हिशोबांवरील अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अधिपत्याखालील राज्यस्तरीय विविध कार्यालये व अन्य कार्यालयांकडील प्रलंबित निरीक्षण अहवाल व परिच्छेदांबाबतची दिनांक ३१-१२-२०२३ पर्यंतची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कोणाकडून प्राप्त झाले | एकूण प्रलंबित निरीक्षण अहवाल | एकूण प्रलंबित परिच्छेद |
|---|---|---|---|
| १. | निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई | १६९ | ९१८ |
| २. | महालेखापाल (लेखापरीक्षा-१ व २), महाराष्ट्र (राज्य वित्त व्यवस्था अहवाल.) | १ | ७ |
| | एकूण ... | १७० | ९२५ |

निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई यांच्याकडील प्रलंबित अहवाल जलदगतीने निकाली काढण्याच्या उद्देशाने शासन निर्णय, क्रमांक पी. ए. सी. १०८६/५६२३/३२७३/ना. पु. २२, दि. १२-५-१९८६ अन्वये लेखापरीक्षण समितीची स्थापना करण्यात आली असून, आजमितीस लेखापरीक्षण समितीच्या एकूण ३७ बैठका घेण्यात आल्या आहेत.

(ब) लोकलेखा समिती २०१७-२०१८ च्या ३८ व्या अहवालातील सन २०१२-२०१३ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. २.२ मधील एकूण २५ शिफारशी व ४६ व्या अहवालातील सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद. क्र. ३.२ मधील एकूण ८ शिफारशी अशा एकूण ३३ शिफारशींवर मा. महालेखापाल, मुंबई यांचेकडून संमती (Vetting) घेऊन पुढील कार्यवाही सुरु आहे.

# अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
## परिशिष्ट(अ)

(रुपये हजारांत)

| तपशील | | | प्रत्यक्ष रकमा २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ | सुधारित अंदाज २०२३-२०२४ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२४-२०२५ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | २ | ३ | ४ | ५ |
| **प्रधान शीर्षवार सारांश** | | | | | | |
| **ए—महसुली लेख्यावरील खर्च** | | | | | | |
| २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण | ... | दत्तमत | ६,६० | १०,०० | १०,०० | १०,०० |
| २४०८, अन्न, साठवण व वखार | | भारित | २५,११,७२ | २५,५२,५० | २२,९७,२५, | २६,८०,१३ |
| | | दत्तमत | ३९७०,३५,३२ | ३१५२,०८,३० | ३९५८,७२,९३ | १५५०,००,२७ |
| ३४५१, सचिवालयीन—आर्थिक सेवा | | दत्तमत | ३०,०६,८७ | ३६,५९,६५ | ३१,१९,४८ | ५४,७३,७५ |
| ३४७५, इतर सर्वसाधारण आर्थिक सेवा | | दत्तमत | ७४,१२,५८ | ८२,७२,६५ | ८०,६०,५० | ८५,८६,६४ |
| एकूण—ए-महसुली लेख्यावरील खर्च | | भारित | २५,११,७२ | २५,५२,५० | २२,९७,२५, | २६,८०,१३ |
| | | दत्तमत | ४०७४,६१,३७ | ३२७१,५०,६० | ४०७०,६२,९१ | १६९०,७०,६६ |
| एकूण | | ... | ४०९९,७३,०९ | ३२९७,०३,१० | ४०९३,६०,१६ | १७१७,५०,७९ |
| **बी—भांडवली लेख्यावरील खर्च** | | | | | | |
| ४४०८, अन्न, साठवण व वखार यांवरील भांडवली खर्च. | | दत्तमत | ९३९१,६९,९४ | ११७७३,४१,४७ | ११७७३,४१,५० | १५३३०,३४,८१ |
| ५४७५, इतर सर्वसाधारण आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च. | | दत्तमत | ७,१९,४८ | १९,२८,०० | १५,४८,४० | १८,६०,०१ |
| एकूण—बी-भांडवली लेख्यावरील खर्च | | भारित | ... | ... | ... | ... |
| | | दत्तमत | ९३९८,८९,४२ | ११७९२,६९,४७ | ११७८८,८९,९० | १५३४८,९४,८२ |
| एकूण | | ... | ९३९८,८९,४२ | ११७९२,६९,४७ | ११७८८,८९,९० | १५३४८,९४,८२ |
| **सी—ऋण शीर्षाखालील खर्च** | | | | | | |
| ७६१०, शासकीय कर्मचारी, इत्यादींना कर्जे | | दत्तमत | ५,३१,०३ | ६,१८,०१ | ६,१८,०१ | ७,७३,०१ |
| एकूण—सी—ऋण शीर्षाखालील खर्च | | भारित | ... | ... | ... | ... |
| | | दत्तमत | ५,३१,०३ | ६,१८,०१ | ६,१८,०१ | ७,७३,०१ |
| एकूण | | ... | ५,३१,०३ | ६,१८,०१ | ६,१८,०१ | ७,७३,०१ |
| स्थूल बेरीज... | | भारित | २५,११,७२ | २५,५२,५० | २२,९७,२५ | २६,८०,१३ |
| | | दत्तमत | १३४७८,८१,८२ | १५०७०,३८,०८ | १५८६५,७०,८२ | १७०४७,३८,४९ |
| एकूण | | ... | १३५०३,९३,५४ | १५०९५,९०,५८ | १५८८८,६८,०७ | १७०७४,१८,६२ |

# अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

**मागणी क्रमांक एम-१**

(रुपये हजारांत)

| तपशील<br>१ | | प्रत्यक्ष रकमा<br>२०२२-२०२३<br>२ | अर्थसंकल्पीय अंदाज<br>२०२३-२०२४<br>३ | सुधारित अंदाज<br>२०२३-२०२४<br>४ | अर्थसंकल्पीय अंदाज<br>२०२४-२०२५<br>५ |
|---|---|---|---|---|---|
| **२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण** | | | | | |
| **एक—सारांश** | | | | | |
| ००, | | | | | |
| ६०, इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम | | | | | |
| १०४, ठेव संलग्न विमा योजना— | | | | | |
| शासकीय भविष्य निर्वाह निधी | दत्तमत | ६,६० | १०,०० | १०,०० | १०,०० |
| एकूण—६० | दत्तमत | ६,६० | १०,०० | १०,०० | १०,०० |
| स्थूल बेरीज | दत्तमत | ६,६० | १०,०० | १०,०० | १०,०० |
| **दोन—तपशील** | | | | | |
| ६०, इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम | | | | | |
| १०४, ठेव संलग्न विमा योजना— | | | | | |
| शासकीय भविष्य निर्वाह निधी<br>(००)<br>(००)(०१) ठेव संलग्न विमा योजनेनुसार प्रदाने (अनिवार्य) (२२३५ ०६७९). | | | | | |
| ५०, इतर खर्च ... | ... | ६,६० | १०,०० | १०,०० | १०,०० |
| एकूण—१०४ | दत्तमत | ६,६० | १०,०० | १०,०० | १०,०० |
| स्थूल बेरीज-२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण | दत्तमत | ६,६० | १०,०० | १०,०० | १०,०० |
| **तीन—वसुलीच्या रकमांचा तपशील** | | | | | |
| ०० | | | | | |
| ९११, अतिप्रदानाची वसुली<br>(००)<br>(००) (०१) अतिप्रदानाची वसुली (अनिवार्य) (२२३५बी५२१) | | | | | |
| ७०,वजा–वसुली | ... | ... | ... | ... | ... |
| निव्वळ बेरीज-२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण | भारित | ... | ... | ... | ... |
| | दत्तमत | ६,६० | १०,०० | १०,०० | १०,०० |
| एकूण- ... | | ६,६० | १०,०० | १०,०० | १०,०० |

# अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

**मागणी क्रमांक एम-२**

(रुपये हजारांत)

| तपशील | | प्रत्यक्ष रकमा २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ | सुधारीत अंदाज २०२३-२०२४ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२४-२०२५ |
|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ | ५ |
| २४०८, अन्न, साठवण व वखार | | | | | |
| **एक—सारांश** | | | | | |
| ०१, अन्न | | | | | |
| ००१, संचालन व प्रशासन … … | दत्तमत | ७९ | १,२३,६० | ६०,८९ | १,१७,३२ |
| १०१, प्रापण व पुरवठा … | भारित | २५,११,७२ | २५,५२,५० | २२,९७,२५ | २६,८०,१३ |
| | दत्तमत | ३९७०,३४,३७ | ३१५०,८४,६७ | ३९५८,१२,०१ | १५४८,८२,९४ |
| १०२, अन्न अर्थसहाय्य … … | दत्तमत | १६ | १ | १ | १ |
| ८००, इतर खर्च … … | दत्तमत | … | २ | २ | … |
| एकूण—०१ | भारित | २५,११,७२ | २५,५२,५० | २२,९७,२५ | २६,८०,१३ |
| | दत्तमत | ३९७०,३५,३२ | ३१५२,०८,३० | ३९५८,७२,९३ | १५५०,००,२७ |
| एकूण … | | ३९९५,४७,०४ | ३१७७,६०,८० | ३९८१,७०,१८ | १५७६,८०,४० |
| स्थूल बेरीज … | भारित | २५,११,७२ | २५,५२,५० | २२,९७,२५ | २६,८०,१३ |
| | दत्तमत | ३९७०,३५,३२ | ३१५२,०८,३० | ३९५८,७२,९३ | १५५०,००,२७ |
| एकूण … | | ३९९५,४७,०४ | ३१७७,६०,८० | ३९८१,७०,१८ | १५७६,८०,४० |
| वजा—वसुली | दत्तमत | ९७,३४ | ७,०३,४० | ३,२३,८६ | ७,०३,४१ |
| निव्वळ बेरीज २४०८, अन्न, साठवण व वखार | भारित | २५,११,७२ | २५,५२,५० | २२,९७,२५ | २६,८०,१३ |
| | दत्तमत | ३९६९,३७,९८ | ३१४५,०४,९० | ३९५५,४९,०७ | १५४२,९६,८६ |
| एकूण … | | ३९९४,४९,७० | ३१७०,५७,४० | ३९७८,४६,३२ | १५६९,७६,९९ |
| **दोन—तपशील** | | | | | |
| ०१,अन्न | | | | | |
| ००१, संचालन व प्रशासन | | | | | |
| (०१) आस्थापना | | | | | |
| (०१)(०१) राज्य अन्न आयोग, (२४०८०७१६) महाराष्ट्र राज्य, मुंबई (अनिवार्य) | | | | | |
| (०१) वेतन … … | | … | ८३,८० | २८,०० | ८३,८० |
| (०२) मजुरी … … | | … | १ | १ | १ |
| (०३) अतिकालिक भत्ता … … | | … | १ | १ | १ |
| (०६) दूरध्वनी, वीज, व पाणी शुल्क … | | १५ | १,२३ | १,११ | १,२३ |
| (१०) कंत्राटी सेवा … … | | … | ३,०० | २,७० | ३,०० |
| (११) देशांतर्गत प्रवास खर्च … | | … | २,१० | १,४७ | २,२१ |
| (१३) कार्यालयीन खर्च … … | | ६४ | १३,५० | १२,१५ | १०,६५ |
| (१४) भाडेपट्टी व कर … … | | … | १० | ९ | १० |
| (१६) प्रकाशने … … | | … | १,०० | ७० | १,०० |
| (१७) संगणक खर्च … … | | … | ५,०० | ३,७५ | १,४६ |
| (२०) इतर प्रशासकीय खर्च … | | … | ६० | ४२ | ६० |
| (२६) जाहिरात व प्रसिद्धी … | | … | १,२५ | ८८ | १,२५ |
| (२८) व्यावसायिक सेवा … … | | … | १२,०० | ९,६० | १२,०० |
| एकूण—(०१)(०१) … | | ७९ | १,२३,६० | ६०,८९ | १,१७,३२ |
| एकूण—००१ … | दत्तमत | ७९ | १,२३,६० | ६०,८९ | १,१७,३२ |
| १. | प्रबंधक (विधी) | एस-२३ : ६७,७००-२,०८,७०० | ३ | ३ |
| २. | प्रबंधक | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० | १ | १ |
| **गट-ब** | | | | |
| ३. | प्रबंधक (जिल्हा तक्रार निवारण मंच) | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | ४० | ४० |
| ४. | लेखाधिकारी | एस-१६ : ४४,९००-१,४२,४०० | ३ | ३ |
| ५. | लेखापाल | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | ४० | ४० |
| ६. | लघुलेखक (उच्च श्रेणी) | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | ४३ | ४३ |
| ७. | लघुलेखक (निम्न श्रेणी) | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | ४२ | ४२ |
| **गट-क** | | | | |
| ८. | शिरस्तेदार/अधीक्षक/जनसंपर्क अधिकारी | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | ५२ | ५२ |
| ९. | सहायक अधीक्षक | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० | ४२ | ४२ |
| १०. | वरिष्ठ अभिलेखापाल/वरिष्ठ लिपिक/अभिलेखापाल | एस-८ : २५,५००-८१,१०० | ४३ | ४३ |
| ११. | लिपिक-टंकलेखक/कनिष्ठ लिपिक | एस-६ : १९,९००-६३,२०० | ८८ | ८८ |
| १२. | बेलिफ | एस-६ : १९,९००-६३,२०० | १ | १ |
| १३. | वाहन चालक | एस-६ : १९,९००-६३,२०० | १ | ० (मृत संवर्ग) |
| १४. | पोलिस शिपाई | एस-७ : २१,७००-६९,१०० +(रु. ७५०/- विशेष वेतन) | १ | १ |
| **गट-ड** | | | | |
| १५. | रखवालदार | एस-१ : १५,०००-४७,६०० | ३ | ० (मृत संवर्ग) |
| १६. | शिपाई | एस-१ : १५,०००-४७,६०० | ९३ | ० (मृत संवर्ग) |
| १७. | सफाई कामगार | एस-१ : १५,०००-४७,६०० | १ | ० (मृत संवर्ग) |
| | | **एकूण (अ+ब+क+ड)** | **... ४९७** | **३९९** |

**(ब) बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा**

| अ.क्र. | सेवा | | | मनुष्यबळ संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | | | ३. |
| १. | वाहन चालक | ... | ... | १ |
| २. | रखवालदार | ... | ... | ३ |
| ३. | शिपाई | ... | ... | ९३ |
| ४. | सफाई कामगार | ... | ... | १ |
| | **एकूण** | **...** | **...** | **९८** |

## राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समितीमधील पदांचा सुधारित आकृतीबंध

**(अ) नियमित पदे**

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगानुसार | जुन्या आकृतीबंधानुसार मंजूर पदे | सुधारित आकृतीबंधानुसार मंजूर पदे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **गट-अ** | | | | |
| १. | खाजगी सचिव | एस-२३ : ६७,७००-२,०८,७०० | १ | ० (मृत संवर्ग) |
| **गट-ब** | | | | |
| २. | स्वीय सहायक | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | २ | २ |
| ३. | लघुलेखक (निम्न श्रेणी) | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | १ | ० (मृत संवर्ग) |
| **गट-क** | | | | |
| ४. | लिपिक-टंकलेखक | एस-६ : १९,९००-६३,२०० | १ | ० (मृत संवर्ग) |
| ५. | वाहन चालक | एस-६ : १९,९००-६३,२०० | १ | ० (मृत संवर्ग) |
| **गट-ड** | | | | |
| ६. | शिपाई/संदेशवाहक | एस-१ : १५,०००-४७,६०० | २ | ० (मृत संवर्ग) |
| | | **एकूण (अ+ब+क+ड)** | **... ८** | **२** |

**(ब) बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा**

| अ.क्र. | सेवा | | | मनुष्यबळ संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | | | ३. |
| १. | वाहन चालक | ... | ... | १ |
| २. | शिपाई | ... | ... | २ |
| | **एकूण** | **...** | **...** | **३** |

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई कार्यालयातील पदांचा सुधारित आकृतीबंध

**(अ) नियमित पदे**

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगानुसार | जुन्या आकृतीबंधानुसार मंजूर पदे | सुधारित आकृतीबंधानुसार मंजूर पदे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | **गट-अ** | | | |
| १. | नियंत्रक | संवर्ग पद | १ | १ |
| २. | उपनियंत्रक शिधावाटप | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० | ७ | ७ |
| | **गट-ब** | | | |
| ३. | सहायक नियंत्रक शिधावाटप | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | ७ | ७ |
| ४. | लघुलेखक (उच्च श्रेणी) | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | १ | १ |
| ५. | लघुलेखक (निम्न श्रेणी) | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | ७ | ३ |
| ६. | संशोधन अधिकारी | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | १ | १ |
| ७. | सहायक लेखाधिकारी | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | १ | ६ |
| ८. | शिधावाटप अधिकारी/मुख्य निरीक्षण अधिकारी | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | ६० | ६४ |
| | **गट-क** | | | |
| ९. | सहायक शिधावाटप अधिकारी/कनिष्ठ लिपिक | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० | १६० | १६० |
| १०. | शिधावाटप निरीक्षक/वरिष्ठ लिपिक | एस-८ : २५,५००-८१,१०० | ६८३ | ४४८ |
| ११. | लघुटंकलेखक | एस-८ : २५,५००-८१,१०० | १ | ० (मृत संवर्ग) |
| १२. | दूरध्वनी चालक | एस-७ : २१,७००-६९,१०० | १ | १ |
| १३. | लिपिक-टंकलेखक/कनिष्ठ लिपिक | एस-६ : १९,९००-६३,२०० | ५९४ | ४२९ |
| १४. | मोटार सायकल संदेशवाहक | एस-५ : १८,०००-५६,९०० | २ | ० (मृत संवर्ग) |
| १५. | वाहन चालक | एस-६ : १९,९००-६३,२०० | १२ | ० (मृत संवर्ग) |
| | **गट-ड** | | | |
| १६. | दफ्तरी | एस-३ : १६,६००-५२,४०० | ७ | ० (मृत संवर्ग) |
| १७. | नाईक | एस-३ : १६,६००-५२,४०० | २८ | ० (मृत संवर्ग) |
| १८. | शिपाई/पहारेकरी/झेरॉक्स ऑपरेटर/ सफाईगार | एस-१ : १५,०००-४७,६०० | २१८ | ० (मृत संवर्ग) |
| १९. | सफाईगार (अंशकालिन) | ... | ५० | ० (मृत संवर्ग) |
| २०. | मेहतर (अंशकालिन) | ... | ४९ | ० (मृत संवर्ग) |
| | | **एकूण (अ+ब+क+ड)** ... | **१८९०** | **११२८** |

**(ब) बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा**

| अ.क्र. | सेवा | | | मनुष्यबळ संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | | | ३. |
| १. | वाहन चालक | ... | ... | ९ |
| २. | शिपाई/पहारेकरी/झेरॉक्स ऑपरेटर सफाईगार/दफ्तरी/नाईक/मेहतर (अंशकालिन) /सफाईगार (अंशकालिन) | ... | ... | १५५+९९ |
| | **एकूण** | **...** | **...** | **२६३** |

## राज्य अन्न आयोग, मुंबई कार्यालयातील पदांचा सुधारित आकृतीबंध

अन्न सुरक्षा कायदा, २०१३ मधील तरतुदीनुसार प्रत्येक राज्याने राज्य अन्न आयोगाची स्थापना करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यानुसार विभागाचा शा. नि -आस्थाप्र/१०१७/प्र. क्र.१७९/नापु-१५ दिनांक २७-०६-२०१७ च्या शासन निर्णयानुसार या कार्यालयाकरिता विविध संवर्गात ११ पदे निर्माण करण्यात आली आहेत.

**(अ) नियमित पदे**

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगानुसार | विभागाच्या दि. २७-०७-२०१७ च्या शासन निर्णयानुसार मंजूर पदे | सुधारित आकृतीबंधानुसार मंजूर पदे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **गट-अ** | | | | |
| १. | सचिव | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० | १ | १ |
| २. | विधी अधिकारी | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० | १ | १ |
| **गट-ब** | | | | |
| ३. | लेखाधिकारी | एस-१६ : ४४,९००-१,४२,४०० | १ | १ |
| ४. | लघुलेखक (उच्च श्रेणी) | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | १ | १ |
| ५. | लघुलेखक (निम्न श्रेणी) | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | १ | १ |
| **गट-क** | | | | |
| ६. | वरिष्ठ लिपिक | एस-८ : २५,५००-८१,१०० | २ | २ |
| ७. | लिपिक टंकलेखक | एस-६ : १९,९००-६३,२०० | २ | २ |
| **गट-ड** | | | | |
| ८. | शिपाई | एस-१ : १५,०००-४७,६०० | २ | ० (मृत संवर्ग) |
| | | **एकूण (अ+ब+क+ड) ...** | **११** | **९** |

**(ब) बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा**

| अ.क्र. | सेवा | | | मनुष्यबळ संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | | | ३. |
| १. | शिपाई- | ... | ... | २ |
| | **एकूण** | **...** | **...** | **२** |

## विभागीय स्तरावरील पुरवठा कार्यालयातील पदांचा सुधारित आकृतीबंध

**(अ) नियमित पदे**

| अ. क्र. १ | पदनाम २ | वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगानूसार ३ | जुन्या आकृतीबंधानूसार मंजूर पदे ४ | सुधारित आकृतीबंधानूसार मंजूर पदे ५ |
|---|---|---|---|---|
| | **गट-अ** | | | |
| १. | उप आयुक्त (पुरवठा) | एस-२५ : ७८,८००-२,०९,२०० | ६ | ६ |
| २. | जिल्हा पुरवठा अधिकारी | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० | ३४ | ३४ |
| ३. | अन्न धान्य वितरण अधिकारी | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० | ४ | ३ |
| | **गट-ब** | | | |
| ४. | सहायक विभागीय पुरवठा अधिकारी, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी/ सहायक अन्नधान्य वितरण अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी, गट-ब/ खरेदी अधिकारी (धान्य)/तांत्रिक अधिकारी | एस-१६ : ४४,९००-१,४२,४०० | ७६ | ६४ |
| ५. | वाहतूक अधिकारी | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | २ | ० (मृत संवर्ग) |
| ६. | लेखा अधिकारी | एस-१६ : ४४,९००-१,४२,४०० | ७ | ० (मृत संवर्ग) |
| ७. | सहायक लेखाधिकारी | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | २९ | ३७ |
| ८. | निरीक्षण अधिकारी (पुरवठा)/अधीक्षक परिमंडळ अधिकारी/गोदाम व्यवस्थापक, श्रेणी-१/ गोदाम पर्यवेक्षक | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | २१८ | ३७८ |
| | **गट-क** | | | |
| ९. | विभागीय गोदाम निरीक्षक | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० | ६ | ० (मृत संवर्ग) |
| १०. | लेखा पर्यवेक्षक/उप लेखापाल | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० | ६३ | ५१ |
| ११. | पुरवठा निरीक्षक/अव्वल कारकून (पुरवठा)/ धान्य खरेदी निरीक्षक/ गोदाम व्यवस्थापक, श्रेणी-२ | एस-१० : २९,२००-९२,३०० | १४८३ | १२४५ |
| १२. | लघुटंकलेखक | एस-८ : २५,५००-८१,१०० | २० | १४ |
| १३. | पुरवठा लेखापाल | एस-१० : २९,२००-९२,३०० | ३ | ० (मृत संवर्ग) |
| १४. | वरिष्ठ लेखापाल | ... | ३ | ० (मृत संवर्ग) |
| १५. | लिपिक-टंकलेखक/कनिष्ठ लिपिक/ गोदाम लिपिक | एस-६ : १९,९००-६३,२०० | १४५५ | १४३२ |
| १६. | वाहन चालक | एस-६ : १९,९००-६३,२०० | ४२ | ० (मृत संवर्ग) |
| | **गट-ड** | | | |
| १७. | चपराशी/शिपाई/पहारेकरी (गोदाम)/ हमाल-कम-स्वीपर/पहारेकरी/सफाई कामगार | एस-१ : १५,०००-४७,६०० | १२७६ | ० (मृत संवर्ग) |
| | | **एकूण (अ+ब+क+ड)** | **... ४७२७** | **३२६४** |

**(ब) बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा**

| अ.क्र. १ | सेवा २ | | | मनुष्यबळ संख्या ३. |
|---|---|---|---|---|
| १. | वाहन चालक | ... | ... | ४३ |
| २. | चपराशी/शिपाई/पहारेकरी (गोदाम)/ हमाल कम स्वीपर/पहारेकरी/सफाई कामगार | ... | ... | १०३२ |
| | **एकूण** | **...** | **...** | **१०७५** |

## नियंत्रक, वैधमापन शास्त्र, मुंबई कार्यालयातील पदांचा सुधारित आकृतीबंध

**(अ) नियमित पदे**

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगानुसार | जुन्या आकृतीबंधानुसार मंजूर पदे | सुधारित आकृतीबंधानुसार मंजूर पदे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **गट-अ** | | | | |
| १. | नियंत्रक | संवर्ग पद | १ | १ |
| २. | सह नियंत्रक | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० | ८ | ८ |
| **गट-ब** | | | | |
| ३. | उप नियंत्रक | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | ४६ | ४६ |
| ४. | स्वीय सहायक | एस-१६ : ४४,९००-१,४२,४०० | १ | १ |
| ५. | सहायक नियंत्रक | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | ७० | ७० |
| ६. | लघुलेखक (उच्च श्रेणी) | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | १ | १ |
| ७. | लघुलेखक (निम्न श्रेणी) | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | १ | १ |
| ८. | निरीक्षक | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० | २१२ | २१२ |
| **गट-क** | | | | |
| ९. | अधीक्षक | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | ८ | ८ |
| १०. | वरिष्ठ लिपिक | एस-८ : २५,५००-८१,१०० | १२ | १२ |
| ११. | प्रयोगशाळा सहायक | एस-७ : २१,७००-६९,१०० | ९ | ९ |
| १२. | क्षेत्र सहायक | एस-६ : १९,९००-६३,२०० | २२४ | २२८ |
| १३. | मिस्त्री | एस-६ : १९,९००-६३,२०० | ४ | ० (मृत संवर्ग) |
| १४. | लिपिक-टंकलेखक/कनिष्ठ लिपिक | एस-६ : १९,९००-६३,२०० | ६४ | ६४ |
| १५. | वाहन चालक | एस-६ : १९,९००-६३,२०० | ९ | ० (मृत संवर्ग) |
| १६. | वाहन चालक (जड) | एस-६ : १९,९००-६३,२०० | २ | ० (मृत संवर्ग) |
| १७. | क्रेन चालक | एस-६ : १९,९००-६३,२०० | २ | ० (मृत संवर्ग) |
| **गट-ड** | | | | |
| १८. | नाईक | एस-३ : १६,६००-५२,४०० | २७ | ० (मृत संवर्ग) |
| १९. | शिपाई | एस-१ : १५,०००-४७,६०० | २४१ | ० (मृत संवर्ग) |
| २०. | हमाल | एस-१ : १५,०००-४७,६०० | २ | ० (मृत संवर्ग) |
| | | **एकूण (अ+ब+क+ड)** | ... **९४४** | **६६१** |

**(ब) बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा**

| अ.क्र. | सेवा | | | मनुष्यबळ संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | | | ३. |
| १. | वाहन चालक/वाहन चालक (जड)/क्रेन चालक | ... | ... | १३ |
| २. | शिपाई/नाईक/हमाल | ... | ... | २७० |
| | **एकूण** | ... | ... | **२८३** |

| | | | |
|---|---|---|---|
| **कार्यक्रम क्रमांक १** | ... | ... | **१८५** |
| **कार्यक्रम क्रमांक २** | ... | ... | **६४९३** |
| **कार्यक्रम क्रमांक ३** | ... | ... | **९४४** |
| **कार्यक्रम क्रमांक १ ते ३** | ... | ... | **७६२२** |

## परिशिष्ट ''क''

### (परिच्छेद २.४ पहावा)

### अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागातर्फे अंमलबजावणी करण्यात येणारे आदेश/अधिनियम

**१. आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५. (केंद्र शासन)**

या अधिनियमानुसार सरकारला आवश्यक वस्तूंचे उत्पादन, वितरण, व्यापार व वाणिज्य यांचेवर नियंत्रण ठेवण्यासाठी आदेश काढता येतात. आवश्यक वस्तूत अन्नधान्य, खाद्य तेले, तेलबिया, इत्यादि वस्तूंचा समावेश आहे. या अधिनियमाच्या कलम ५ अन्वये केंद्र शासनाने राज्य शासनांना या कायद्याच्या खंड ३ खाली नियंत्रणाबाबतचे आदेश काढण्याविषयी अधिकार प्रदान केला आहेत. तथापि, राज्य शासनास आदेशाची बाब लक्षात घेवून काही आदेश केंद्र शासनाच्या पुर्व संमतीने तर काही पूर्व संमतीशिवायही काढण्यास मुभा आहे. जे आदेश या अधिनियमानुसार काढण्यात आलेले आहेत व त्याचा भंग झाल्यामुळे ज्या आवश्यक वस्तूंचा साठा पकडण्यात आला आहे, तो साठा जप्त करण्याचे अधिकार या अधिनियमाच्या कलम ६-अ अन्वये जिल्हाधिकारी यांना दिलेला आहे. या अधिनियमाचे कक्षेत येणारे सर्व गुन्हे दखल पात्र आहेत. राज्य शासनाने या अधिनियमात काही अडचणी निवारणार्थ दुरुस्त्या केलेल्या आहेत. केंद्र शासनानेही सप्टेंबर १९७६ मध्ये त्याच संदर्भात या अधिनियमात दुरुस्त्या केलेल्या आहेत. आवश्यक वस्तू अधिनियम, १५५ मधील काही तरतुदीत आवश्यक वस्तू (विशेष तरतुदी) अधिनियम, १९८१ अन्वये २० वर्षाच्या कालावधीसाठी दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. हे अधिनियम १ सप्टेंबर १९८२ पासून अंमलात आलेले आहेत. त्या कायद्यातील गुन्ह्यांविषयीचे खटले त्वरित निकालात काढण्यासाठी दिनांक १-९-१९८२ पासून बृहन्मुंबईसह सर्व जिल्ह्यांचे ठिकाणी राज्य शासनाने विशेष न्यायालय स्थापन केली आहेत.

**२. भात गिरणी उद्योग (विनियमन) अधिनियम, १९५८. (केंद्र शासन)**

या अधिनियमाचा उद्देश भातगिरणी उद्योगाचे विनियमन करणे हा आहे. या अधिनियमाचे कक्षात हलर भात गिरणीही येतात.

**३. भात गिरणी उद्योग (विनियमन व अनुज्ञप्ती) नियमावली, १९५९. (केंद्र शासन)**

भात गिरणी उद्योग (विनियमन) अधिनियम १९५८ व भात गिरणी उद्योग (विनियमन करणे व अनुज्ञप्ती देणे) नियम, १९५९ हा अधिनियम व नियम केंद्र शासनाने अंमलात आणले होते. परंतु केंद्र शासनाने त्यांच्या असाधारण राजपत्र भाग-२, खंड-१ च्या दिनांक २८-५-१९९७ च्या अधिसूचनेनुसार सदरील दोन्ही अधिनियम रद्द ''repeal'' केले आहेत. केंद्र शासनाची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात भाग-४ मध्ये दिनांक ८-७-१९९७ रोजी पुनर्प्रकाशित करण्यात आली आहे. त्यामुळे आता नवीन भात गिरणी प्रस्तापित करण्यासाठी परवाना अनुज्ञप्ती यावर राज्य शासनाचे निर्बंध राहीलेले नाही.

**४. महाराष्ट्र तांदूळ (भात गिरणीवाल्यांवरील वसुली) आदेश १९८९.**

महाराष्ट्र तांदूळ (भात गिरणीवाल्यांवरील वसुली) आदेश १९८९ ची अंमलबजावणी करण्याचे राज्य शासनाने ठरविले असून सदरहू आदेशाअंतर्गत २०११-२०१२ या खरीप पणन हंगामामध्ये भात गिरणीवाल्यांकडून ऐच्छिक लेव्ही वसुलीचे आदेश दि. १५ मे २०१२ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार मिलर्सकडून लेव्ही तांदूळ भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करण्याचा कालावधी दिनांक ३० सप्टेंबर २०१२ पर्यंत होता. केंद्र शासनाने त्यांच्या दि. १८ सप्टेंबर २०१२ च्या पत्रान्वये ३१-१०-२०१२ पर्यंत मुदतवाढ दिल्याचे कळविले आहे परंतु ती ही मुदतवाढ संपुष्टात आली आहे.

**५. धान्याच्या आयातीसंबंधिचे (अनधिकृत विक्रीवरील निर्बंध) आदेश, १९५८. (केंद्र शासन)**

हा आदेश आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये काढला आहे. या आदेशानुसार अधिकारी दिलेल्या व्यापाराव्यतिरिक्त इतर कोणाही व्यक्तीस आयात केलेले (भारताबाहेरुन आणलेले) धान्य जसेच्या तसे अगर तुकडे करुन विकता येणार नाही किंवा इतर धान्यात मिसळता येणार नाही.

**६. अन्नधान्यासंबंधी (स्टार्चच्या उत्पादनात वापरण्यात प्रतिबंध) आदेश, १९६६. (केंद्र शासन)**

हा आदेश आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये काढला आहे. ह्या आदेशानुसार स्टार्च करणाऱ्या कारखान्यासाठी कोणतेही अन्नधान्य देशी व संकरीत मक्याखेरीज (भारतात तयार झालेले) उपयोगात आणण्यास अगर विकत घेण्यास प्रतिबंध आहे. खराब झालेल्या, नासाडी झालेल्या व खाण्यास उपयुक्त नसलेल्या अन्नधान्याचा उपयोग स्टार्च करणाऱ्या कारखान्यात करता येणार नाही. मात्र जर मनुष्यास खाण्यास योग्य नाही असा दाखला मिळाला असेल, व त्या मालाचे अधिकृत परवाने शासनाने दिले असतील तर अशा धान्याचा उपयोग सदरच्या कारखान्यात करता येईल.

**७. महाराष्ट्र अन्नधान्य व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९६३. (राज्य शासन)**

हा आदेश आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या अधिनियमान्वये काढण्यात आला आहे. या आदेशाप्रमाणे अनुसूचित धान्याची ५० क्विंटलहून अधिक प्रमाणात एकाच वेळी खरेदी/विक्री, विक्रीसाठी साठवणूक वगैरे व्यवहार करणाऱ्या लोकाना अनुज्ञप्ती घेण्याची सवय आहे व त्यांनी आपला धंदा अनुज्ञप्तीच्या अटी व नियमांना अनुसरूनच केला पाहिजे असे बंधन आहे.

**८. महाराष्ट्र अनुसूचित वस्तू (भाव फलक लावणे व वस्तूंवर किंमत लिहिणे) आदेश, १९६६. (राज्य शासन)**

आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या अधिनियमाखाली हा आदेश काढण्यात आला आहे. ह्या आदेशानुसार आदेशातील परिशिष्ट १ मधील सर्व वस्तूंची उपलब्धता व त्यांच्या किंमती फलकावर लावणे किरकोळ व्यापाऱ्यांना आवश्यक आहे. आदेशाच्या परिशिष्ट २ मधील वस्तूंच्या किंमतीही व्यापाऱ्यांनी त्या वस्तूंवर लावणे आवश्यक आहे.

**९. महाराष्ट्र अनुसूचित वस्तू (घाऊक व्यापाऱ्यांनी साठा व भावफलक लावण्यासंबंधी) आदेश, १९६९. (राज्य शासन)**

हा आदेश आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये काढण्यात आलेला आहे. या आदेशातील परिशिष्टात असलेल्या वस्तूंच्या घाऊक व्यापाऱ्यांना हा आदेश लागू आहे. या वस्तूंमध्ये वनस्पती, स्वयंचलित वाहनांचे ट्यूब्ज व टायर्स, खाद्यतेले व तेलबिया इत्यादींचा समावेश आहे. या आदेशानुसार घाऊक व्यापाऱ्यांना साठा व भाव निर्देशिक फलक लावणे, पावत्या देणे, हिशेब ठेवणे, इत्यादी करण्याची आवश्यकता आहे.

**१०. महाराष्ट्र भोजनालय (भाव फलक लावणे व वस्तूंवर किंमत लिहिणे) आदेश, १९७७. (राज्य शासन)**

हा आदेश वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये काढलेला आहे. हा आदेश महानगरपालिका, अ वर्ग नगरपालिका आणि पुणे व खडकी येथील छावणी परिसर क्षेत्रांना लागू आहे. या आदेशानुसार भोजनालयांनी ग्राहकांना पुरवित असलेल्या अन्नपदार्थाचे दर फलकावर लावणे आवश्यक आहे. ह्या आदेशान्वये भाव फलकावर दर्शविलेल्या दरांपेक्षा अधिक दराने अन्नपदार्थ विकण्यास भोजनालयाना प्रतिबंध आहे. तथापि, या आदेशातून पर्यटन विभागाच्या मान्यताप्राप्त पंचतारांकित हॉटेल्सना वगळण्यात आले आहे.

**११. महाराष्ट्र यज्ञातील अन्नधान्य अपव्यय (नियंत्रण) आदेश, १९७५. (राज्य शासन)**

हा आदेश आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये काढण्यात आला आहे. या आदेशानुसार यज्ञप्रसंगी आहुती द्वारा केल्या जाणाऱ्या प्रतिरोधित खाद्यान्नाचा दोन किलोच्या मर्यादेबाहेर वापराला प्रतिबंध करण्यात आला आहे. प्रतिरोधित खाद्यान्यात कडधान्ये, दूध, तूप, खाद्यतेल इत्यादींचा समावेश आहे.

**१२. महाराष्ट्र शेड्युल कमोडिटिज होलसेल डिलर लायसेनिंग ऑर्डर, १९९८. (राज्य शासन)**

हा आदेश आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत काढण्यात आला आहे. या आदेशानुसार कोणत्याही प्रकारच्या साखरेची खरेदी-विक्री करण्याच्या उद्देशाने १० क्विंटलपेक्षा अधिक प्रमाणात साठा करणाऱ्या प्रत्येक व्यापाऱ्याला परवाना घेणे आवश्यक होते. तसेच त्याने परवान्यामध्ये नमूद केलेल्या अटी व नियमानुसार व्यापार करणे आवश्यक होते. आदेशात अनुज्ञप्तीचा नमुना मिळविण्यासाठी आवश्यक असलेला अर्जाचा नमुन्यांचा समावेश आहे. तथापि आता केंद्र शासनाने साखरेवरील साठे मर्यादा वाहतूक परवाना इत्यादीवरील निर्बंध रद्द केलेले आहेत.

**१३. साखर नियंत्रण आदेश, १९६६. (केंद्र शासन)**

आवश्यक वस्तु अधिनियम, १९५५ च्या कलम ३ अन्वये सदर आदेश काढण्यात आला आहे. या आदेशान्वये साखर उत्पादनाचे नियंत्रण केले जाते. साखर उत्पादकांनी उत्पादन केलेल्या साखरेचे नियंत्रण करण्याचे अधिकार सदर आदेशान्वये केंद्र शासनाला देण्यात आलेले आहे. त्याच प्रमाणे साखरेचा साठा, वाहतूक व त्यावरील नियंत्रण आणि विक्रीवर निर्बंध याबाबतचेही अधिकार केंद्र शासनाला देण्यात आलेले आहे.

**१४. महाराष्ट्र लेव्ही साखर (वाटप विनियमन) आदेश, १९८१ (राज्य शासन)**

सदर आदेश आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये काढण्यात आला आहे. सदर आदेश लेव्ही साखरेच्या शिधा वाटप/रास्त भाव दुकानातून करावयाच्या विक्रीला लागू आहे.

**१५. महाराष्ट्र गुळ आणि खांडसरी व्यापारी अनुज्ञप्ती आदेश, १९६३ (राज्य शासन)**

सदर आदेश आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये काढण्यात आला आहे. या आदेशान्वये जो व्यापारी गुळ किंवा खांडसरी साखर याची खरेदी, विक्री किंवा विक्रीकरिता २५ क्विंटलपेक्षा जास्त साठा बाळगत असेल, त्याला तसे करण्यासाठी अनुज्ञप्ती घेण्याची आवश्यकता आहे.

**१६. गुळ (वापर विनियमन) आदेश, १९६८ (केंद्र शासन)**

सदर आदेश वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये काढण्यात आला आहे. या आदेशान्वये खाद्य पदार्थ किंवा औषधी उपयोग या व्यतीरिक्त इतर कामासाठी गुळाचा वापर करण्यास मनाई आहे. तथापि, तंबाखूच्या धंद्यात किंवा इतर तत्सम उद्योगात गुळाचा वापर करण्याचे अधिकार देण्याचे आदेश केंद्र शासनाला प्रदान करण्यात आलेले आहेत.

**१७. महाराष्ट्र घासलेट व्यापारी अनुज्ञप्ती आदेश, १९६६ (राज्य शासन)**

सदर आदेश आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये काढण्यात आला आहे. या आदेशान्वये प्रत्येक व्यापाराला खरेदी विक्री किंवा विक्रीकरिता कितीही घासलेटचा साठा बाळगला तरी त्याला अनुज्ञप्ती घेण्याची आवश्यकता आहे. हात गाडीवर थोड्या प्रमाणात मिळणाऱ्या दर माणसी कोणत्याही एका वेळी १० लिटर पेक्षा कमी विक्री करणाऱ्या फेरीवाल्यांनाही अनुज्ञप्ती घेण्याची अवश्यकता आहे. परवान्याशिवाय कोणाही व्यक्तीस घासलेट धंदा करण्यास मनाई आहे. अनुज्ञप्तीधारकांनाही त्यातील शर्तीनुसार धंदा करण्याची आवश्यकता आहे.

**१८. रॉकेल (वापरावरील निर्बंध आणि कमाल किंमत निश्चित) आदेश, १९९३ (केंद्र शासन)**

सदर आदेश अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ खाली काढण्यात आला आहे. या आदेशान्वये सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत पुरवठा केलेल्या रॉकेलचा वापर फक्त स्वयंपाक किंवा दिवाबत्ती करण्याबाबत निर्बंध घालण्यात आले आहेत. इतर आवश्यक बाबतीत रॉकेलचा वापर करण्यासाठी परवाने देण्याचे अधिकार राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला आहे. या आदेशान्वये सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरीत होणाऱ्या रॉकेलचे विक्रीचे कमाल दर वेळोवेळी केंद्र शासनाकडून निश्चित केले जातात. या आदेशान्वये सार्वजनिक व्यवस्थेमार्फत वितरीत होणाऱ्या रॉकेलचे साठे, त्यांच्या किंमती, आरंभीची शिल्लक, मिळालेला कोटा, विकलेला कोटा आणि शिल्लक साठा इत्यादिंची माहिती फलकावर दर्शविणे आवश्यक आहे.

**१९. (अ) दि. लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (रेग्युलेशन ऑफ सप्लाय अँड डिस्ट्रीब्युशन) ऑर्डर, २००० (केंद्र शासन)**

सदर आदेश अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ खाली काढण्यात आला आहे. या आदेशान्वये सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरीत होणाऱ्या गॅसचा उपयोग फक्त स्वयंपाकासाठी करावयाचा आहे. तथापि, केंद्र शासन आदेशान्वये दूसऱ्या उपयोगासाठी परवानगी देऊ शकते.

**(ब) नॉन प्रेसर स्टोव्हस् (क्वालिटी कंट्रोल) ऑर्डर, १९९० (केंद्र शासन)**

सदर आदेश अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९९५ खाली काढण्यात आला आहे. या आदेशान्वये कोणाही व्यक्तिस स्पेशिफिकेशन कायम होत नसलेल्या नॉन प्रेसर स्टोव्हसच्या विक्रीसाठी उत्पादन किंवा साठा, विक्री अथवा वितरण करण्यास सदर आदेशान्वये निर्बंध घालण्यात आले आहेत.

**(क) दि मोटार स्पिरिट अँड हायस्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय अँड डिस्ट्रीब्युशन अँड प्रिव्हेंशन ऑफ माल प्रेक्टीसेस्) ऑर्डर, २००५**

सदर आदेश अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ खाली काढण्यात आला आहे. या आदेशान्वये मोटार स्पिरीट आणि हायस्पीड या डिझेलच्या गैर व्यवहारास जसे भेसळ, मालात तफावत, अनधिकृत देवाण-घेवाण/खरेदी विक्री, अथवा वितरण करण्यास सदर आदेशान्वये निर्बंध घालण्यात आले आहेत.

**(ड) दि पेट्रोलियम प्रॉडक्टस् (मॅन्टेनन्स ऑफ प्राडक्शन स्टोअरेज ॲन्ड सप्लाय) आदेश, १९९९.**

हा आदेश अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ खाली काढण्यात आला आहे. या आदेशान्वये केंद्र शासनाला तेल वितरण कंपन्या, सहयोगी परीक्षक इत्यादिंना योग्य त्या सूचना देवून पेट्रोलियम उत्पादित वस्तूंचा पुरवठा आणि त्यांचे उत्पादन करणे यांचे विनियमन करण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत.

**(इ) दि नाफ्ता (अक्विझीशन, सेल, स्टोअरेज ॲण्ड प्रिव्हेंशन ऑफ युज इन ॲटोमोबाईल्स) ऑर्डर, २००० (केंद्र शासन)**

केंद्र शासनाच्या सदर आदेशास अनुसरुन महाराष्ट्र शासनाने दि महाराष्ट्र नाफ्ता (लायसेन्सिंग) ऑर्डर, २००९ हा आदेश जारी केलेला आहे. या आदेशान्वये नाफ्ता या पेट्रोलजन्य पदार्थाचे संपादन, विक्री साठा व वापर करणाऱ्यांना अनुज्ञप्ती घेणे बंधनकारक आहे.

**(ई) दि सॉल्वंट, रॅफिनेट ॲण्ड स्लॉप (ॲक्विजिशन, स्टोअरेज, सेल ॲण्ड प्रिव्हेंशन ऑफ युज इन ॲटोमोबाईल्स) ऑर्डर, २००० (केंद्र शासन):**

केंद्र शासनाच्या सदर आदेशास अनुसरुन राज्य शासनाने महाराष्ट्र सॉल्वंट रॅफीनेट ॲन्ड स्लॉप (लायसन्सिंग) ऑर्डर, २००७ हे आदेश काढलेले आहेत. या आदेशान्वये सॉल्वंट रॅफीनेट ॲन्ड स्लॉप या पेट्रोलजन्य पदार्थाचे संपादन, विक्री, साठा व वापर करणाऱ्यांना अनुज्ञप्ती घेणे बंधनकारक झाले आहे.

**(ऊ) एलपीजी ग्राहकांसाठी मॉडीफाईड डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर योजना :**

देशातील ५४ जिल्ह्यांमध्ये दिनांक १५ नोव्हेंबर २०१४ पासून मॉडीफाईड डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर फॉर एल.पी.जी. (MDBTL) स्कीम सुरु करण्यात आली असून महाराष्ट्रातील वर्धा व अमरावती या दोन जिल्ह्यात ही योजना लागू झाली तद्नंतर राज्यातील उर्वरीत जिल्ह्यांमध्ये ही योजना दिनांक १ जानेवारी २०१५ पासून राबविण्यात येत आहे. एमडीबीटीएल योजनेअंतर्गत एकूण २,१०,८९,६२४ लाभार्थी असून त्यापैकी बँक खाते व आधार कार्ड संलग्न केलेले लाभार्थी १,४२,२३,८६७ आहेत व आधार कार्ड संलग्न केलेले लाभार्थी १,७६,७२,८२८ आहेत.

**२०. वनस्पती तेलापासून उत्पादित वस्तूंचे (नियंत्रण) आदेश, १९४७ (केंद्र शासन)**

या आदेशान्वये वनस्पती तेलाचे उत्पादकाकडून विनियमन करण्याचे अधिकार केंद्र शासनाला प्राप्त झाले आहेत.

**२१. महाराष्ट्र हायड्रोजनेटेड वनस्पती तेलाचे (अनुज्ञापन) आदेश, १९७०. (राज्य शासन)**

हा आदेश आवश्यक वस्तू अधिनियम आदेश, १९५५ च्या सहाय्यभूत तरतुदीखाली जारी करण्यात आला आहे. या आदेशान्वये विक्रेत्याला अनुज्ञप्ती घेणे आवश्यक आहे. तसेच एकावेळी १५० किलो वा त्यापेक्षा जास्त प्रमाणात हायड्रोजनेटेड वनस्पती तेलाचा साठा करणारी व्यक्ती तो साठा अन्य कारणासाठी आहे हे सिध्द करु न शकल्यास या आदेशाखाली विक्रेता म्हणून गृहीत धरल्या जातो. या आदेशात अनुज्ञप्तीकरिता करावयाच्या अर्जाचा नमुना तसेच अनुज्ञप्तीचा नमुनाही समाविष्ट करण्यात आला आहे.

**२२. महाराष्ट्र अनुसूचित तेलबिया आणि तेले (व्यापारी व गिरणीवाले) परवाना आदेश, १९७७. (राज्य शासन)**

हा आदेश आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या सहाय्यभूत तरतुदीखाली काढण्यात आला आहे. या आदेशानुसार एकावेळी ५ क्विंटल वा त्यापेक्षा जास्त प्रमाणात अनुसूचित तेलबिया वा तेले याची खरेदी, विक्री वा विक्रीकरिता साठवणूक करणाऱ्या व्यक्तिला अनुज्ञप्ती घेण्याची आवश्यकता आहे. तेलघाणी/तेलगिरणीवाल्यांनासुध्दा परवाना घेण्याची गरज आहे. तसेच त्या आदेशानुसार अनुसूचित तेलबिया/तेले यांच्या वापर धारकांना त्यात घालून दिलेल्या अटी नियमानुसारच व्यापार करण्याचे बंधन आहे.

**२३. वनस्पती तेलाच्या उत्पादित वस्तूंचे (गुणवत्ता व परिमाण) आदेश, १९७५. (केंद्र शासन)**

हा आदेश वनस्पती तेले उत्पादित वस्तु (नियंत्रण) आदेश, १९४७ खाली काढण्यात आला आहे. या आदेशान्वये वनस्पती तेलाच्या उत्पादित वस्तूंचे गुणवत्ता परिमाण ठरवून देण्यात आले आहे.

**२४. सिमेंट गुणवत्ता नियंत्रण आदेश, १९६५. (केंद्र शासन)**

अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या सहाय्यभूत तरतुदीखाली हा आदेश काढण्यात आला आहे. या आदेशानुसार विहीत प्रमाणाप्रमाणे गुणवत्ता नसलेल्या सिमेंटची विक्री वगैरे करण्यात उत्पादकांना मनाई करण्यात आली आहे. या आदेशात दर्शविल्याप्रमाणे सिमेंट गुणवत्तेचे नियंत्रण ठेवण्यासाठी ''योग्य प्राधिकरण'' म्हणून भारत सरकारच्या अवर सचिवाकडून कमी दर्जा नसलेला अधिकारी किंवा राज्य शासनाच्या उद्योग विभागातील महा व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांच्याहून कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याकडे देण्यात आले आहे.

**२५. सिमेंट (नियंत्रण) आदेश, १९६७. (केंद्र शासन)**

उद्योग धंदे (सुधारणा आणि विनियमन) अधिनियम, १९६१ च्या सहाय्यभूत तरतुदीखाली हा आदेश काढण्यात आला आहे. या आदेशान्वये कारखान्यांच्या प्रसीमेपासून इतर कोणत्याही ठिकाणी केंद्र शासनाच्या लेखी संमतीशिवाय सिमेंट हलविण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच या सिमेंटची विक्री आणि वाहतूक या संबंधात उत्पादकांना सूचना देण्याचे अधिकार केंद्र शासनाकडे असून या आदेशाखाली सिमेंटच्या विक्री किंमती, निर्धारित किंमती वैगरे निश्चित केलेल्या आहेत. केंद्र शासनाने दिनांक १-३-१९८९ पासून सिमेंटची विक्री, वाहतूक सिमेंटची किंमत व सिमेंट कारखान्यांनी द्यावयाची लेव्ही सिमेंट संबंधिचे निर्बंध वगळण्यात आलेले आहेत.

**२६. महाराष्ट्र सिमेंट (अनुज्ञापन आणि नियंत्रण) आदेश, १९७३. (राज्य शासन)**

अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ खाली हा आदेश काढण्यात आला आहे. या आदेशानुसार ''स्टॉकिस्ट'' म्हणून खरेदी, विक्री आणि विक्रीकरिता सिमेंटची साठवणूक करणाऱ्या प्रत्येक व्यक्तिला परवाना घ्यावा लागतो. त्याच्यावर परवान्याच्या शर्ती व नियमानुसार काटेकोरपणे सिमेंटचा धंदा करण्याविषयी या आदेशान्वये बंधन घालण्यात आले आहे. राज्य शासनाने दिनांक ३०-१०-१९९० च्या अधिसूचनेनुसार हे आदेश विखंडीत केले आहेत.

**२७. महाराष्ट्र अन्नधान्य वाटप (द्वितीय) आदेश, १९६६. (राज्य शासन)**

हा आदेश आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ ने दिलेल्या अधिकारानुसार काढण्यात आला आहे. या आदेशान्वये शिधावाटपांतर्गत येणाऱ्या अन्न-धान्याचे नियंत्रण केले आहे. त्यानुसार वितरणाचे काम शिधावाटप नियंत्रकांनी परवाना दिलेल्या धान्य दुकानांनी करावयाचे आहे. अधिकृत इसमांना शिधावाटप योजनेअंतर्गत येणाऱ्या अन्नधान्याचे वितरण करण्यास प्रतीबंध आहे. शिधा वाटपासंबंधी नियंत्रण बाळगणा-यांनाच काही अपवाद वगळता, धान्य प्राप्त करुन घेता येते. हा आदेश साठेबाजी व शिधावाटपात अन्नधान्य वाहतूक कागदपत्रे करतो. या आदेशान्वये राज्य शासनाला या आदेशाला पूरक असे विनियमन करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

**२८. महाराष्ट्र अन्नधान्य वाटप (द्वितीय) अधिनियम, १९६६. (राज्य शासन)**

हे अधिनियम महाराष्ट्र अन्नधान्य वाटप (द्वितीय) आदेश, १९६६ अन्वये काढण्यात आला आहे. या अधिनियमानुसार कौटुंबिक तथा आस्थापनासाठी आवश्यक असलेल्या शिधापत्रिका मिळविण्याची माहिती दिली आहे. या अधिनियमात विविध अर्जाचे नमुने, शिधापत्रिकांचे नमुने यांचा समावेश आहे. तसेच नियंत्रीत धान्याची आयात व निर्यात, शिधावाटप दुकानांनी पाळावयाच्या अटी, विविध प्रकारच्या शिधापत्रिका वैगेरेंना लागणाऱ्या शुल्काची माहीती देखील या अधिनियमात आहे.

**२९. महाराष्ट्र अनुसूचित वस्तू (वितरण नियमन) आदेश, १९७५. (राज्य शासन)**

हा आदेश आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ ने दिलेल्या अधिकारानुसार काढण्यात आला आहे. हा आदेश शिधावाटप विभाग वगळता संपूर्ण राज्यभर लागू आहे. या आदेशान्वये अधिकृत स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमामार्फत अनुसूचित वस्तूंचे वितरण नियंत्रण केले आहे. अनुसूचित वस्तूंमध्ये तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी, मिलो, खाद्य तेले इत्यादिंचा समावेश आहे. या आदेशान्वये शासनाला उत्पादक, वितरक वैगेरे मंडळींना आपले एजंट म्हणून नेमण्याचा अधिकार आहे. तत्संबंधिच्या शर्ती वैगेरे शासनाने ठरवावयाच्या आहे. अनधिकृतपणे अनूसूचित वस्तूंची विक्री करणे किंवा विक्री करण्यास संमती

दाखविणे वैगेरे बाबत स्वस्त धान्य दुकानदारांना प्रतिबंध करण्यात आला आहे. योग्य ती कागदपत्रे दाखविल्यावरच या दुकानांना अनुसूचित वस्तूंचा कायदेशीर वापरासाठी कायदेशीररित्या पुरवठा करता येतो. हा आदेश साठेबाजी, गैरहजर व्यक्तिंचे धान्य घेणे वैगेरे प्रतिबंध करतो. या आदेशाला पूरक असे अधिनियम करण्याचा अधिकार राज्य शासनाला या आदेशान्वये प्राप्त झाला आहे.

**३०. महाराष्ट्र अनुसूचित वस्तू (वितरण नियमन) आदेश, १९७५. (राज्य शासन)**

हे अधिनियम महाराष्ट्र अनुसूचित वस्तू (वितरण नियमन) आदेश, १९७५ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार काढलेले आहेत. त्यात कौटुंबिक तथा आस्थापनांना लागणाऱ्या शिधापत्रिका मिळविण्याची पध्दती दाखविली आहे. तसेच यात शिधापत्रिकेचा नमुना, त्यासाठी आवश्यक असलेल्या अर्जाचा नमुना वगैरेचा समावेश आहे. स्वस्त धान्य दुकाने किंवा त्यांचे प्रतिनिधी (एजंटस्) यांना पाळावयाच्या अटी वगैरेंचा समावेश त्यात आहे.

**३१. डाळी, खाद्य तेलबिया आणि खाद्य तेले (साठवणूक, नियंत्रण) आदेश, १९७७. (केंद्र शासन)**

हा आदेश आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ खाली प्रदान केलेल्या अधिकाराखाली काढण्यात आलेला आहे. ह्या आदेशात डाळी, खाद्य तेले, वनस्पती तूप आणि तेलबिया अंतर्भूत आहेत. या आदेशानुसार निर्माता, घाऊक आणि किरकोळ विक्रेत्यांकरिता डाळी, खाद्यतेल, बिया व खाद्यतेलाच्या बाबतीत शहरांच्या वर्गीकरणानुसार निरनिराळया साठ्याची मर्यादा निश्चित केली आहे.

**३२. महाराष्ट्र डाळी (व्यापारी आणि गिरणीवाले) अनुज्ञप्ती आदेश, १९७७. (राज्य शासन)**

आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या अधिनियमानुसार काढलेल्या ह्या आदेशाद्वारे कुणाही व्यक्तिला सर्व प्रकारच्या डाळी मिळून एका वेळी ५ क्विंटलच्या वर साठवणूक वा व्यापार करावयाचा असेल, तर अनुज्ञप्ती काढणे आवश्यक आहे. डाळ गिरणीवाल्यांनाही अनुज्ञप्ती घ्यावी लागते. या आदेशानुसार प्रत्येक अनुज्ञप्तीधारकांना अनुज्ञप्तीच्या शर्ती आणि अटीप्रमाणे व्यापार करणे अत्यंत आवश्यक आहे.

**३३. महाराष्ट्र अनुसूचित वस्तू किरकोळ विक्रेते अनुज्ञप्ती आदेश, १९७९. (राज्य शासन)**

हा आदेश आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये काढला आहे. त्या आदेशान्वये एकापेक्षा अधिक, अनुसूचित वस्तूंची विक्री करणाऱ्या किरकोळ विक्रेत्याने एकच परवाना धारण करण्याविषयी तरतूद करण्यात आली आहे.

**३४. वैधमापन शास्त्र अधिनियम, २००९ आणि त्याखालील नियम**

लोकसभेने वैधमापन शास्त्र अधिनियम, २००९ हा अधिनियम केला व त्याखालील नियम " महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ " हे महाराष्ट्र शासनाने तयार करुन ते दिनांक २८-४-२०११ पासून अंमलात आणले. या आदेशातील तरतुदीनुसार व्यापार, वाणिज्य औद्योगिक उत्पादन व संरक्षण यात वापरली जाणारी किंवा वापरण्याच्या हेतूने बाळगलेली वजने व मापे यांची तपासणी व ठसे मारणे याचा अंतर्भाव आहे. जास्तीत जास्त शास्त्रशुध्दता राखण्यासाठी निरनिराळी परिमाणे नेमून दिलेली आहेत. वैधमापन शास्त्र यंत्रणेचा मुख्य हेतू " वैधमापन शास्त्र अधिनियम, २००९" व त्याखालील नियम ह्याची अंमलबजावणी करुन व व्यापार आणि वाणिज्य यात वापरली जाणारी वजने व मापे यांची त्यावर ठसे मारण्याकरिता आणि तत्संबंधिच्या साधनांची तपासणी निरीक्षकांनी बनविलेल्या कार्यक्रमानुसार सर्व राज्यातून अंमलबजावणी करणे हा आहे. ह्या अधिनियमाची कायदेशीर अंमलबजावणी होण्यासाठी निरिक्षकांना रांची येथील भारत सरकारच्या संस्थेत योग्य ते प्रशिक्षण दिले जाते. लबाड व्यापाऱ्यांवर खटले दाखल केले जातात, व दंड केला जातो. एकंदरीत वैधमापनशास्त्र यंत्रणेचा मुख्य उद्देश ग्राहक संरक्षण असून लबाड व्यापाऱ्यांपासून संरक्षण देणे आहे. वरील उद्देशासाठी संदर्भित कायद्यांची अंमलबजावणी केली जात आहे.

**३५. साखर (मान्यताप्राप्त व्यापाऱ्यांनी ठेवून घेऊन विक्री करण्यासंबंधी) आदेश, १९७९. (केंद्र शासन)**

सदर आदेश आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये काढण्यात आला. या आदेशात मान्यताप्राप्त साखर व्यापाऱ्यांनी आदेश अंमलात आलेल्या दिवशी दिनांक १७-१२-१९७९ धंदा बंद करतेवेळी असलेल्या शिल्लक साखरेच्या साठ्यापैकी ६५ टक्के साठा राज्य शासनास नियंत्रीत दराने विक्रीसाठी राखून ठेवण्याची व विक्री करण्यासंबंधी तरतूद आहे.

**३६. लेव्ही साखर पुरवठा (नियंत्रण) आदेश, १९७९ (केंद्र शासन)**

सदर आदेश आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये काढण्यात आला. तो केंद्र शासनास साखर कारखानदाराला व मान्यताप्राप्त व्यापाऱ्यांना राज्य शासनाला साठवणुकीसाठी, वितरणासाठी किंवा विक्रीसाठी लेव्ही साखर उपलब्ध करून देण्यासंबंधीचे निर्देश देण्यास समर्थन करतो.

**३७. महाराष्ट्र वैरण (वाहतूक निर्बंध) आदेश, १९८५. (राज्य शासन)**

हा आदेश आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये काढला आहे. या आदेशान्वये राज्य शासनाने जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या परवान्याखेरीज त्या जिल्ह्यातून अन्य जिल्ह्यात वैरणीची वाहतूक करण्यास तात्पूरती बंदी घातली आहे.

**३८. सिमेंट नियंत्रण (उत्पादनाचे विनियमन) आदेश, १९८२. (केंद्र शासन)**

अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या साह्यभूत तरतुदीखाली हा आदेश काढण्यात आला आहे. या आदेशानुसार आदेशात नमूद नसलेल्या कोणत्याही प्रकारचे सिमेंट विक्रीसाठी, उत्पादन करण्यास मनाई करण्यात आली आहे.

**३९. चहा (व्यापारांची नोंदणी व साठे जाहीर करणे) आदेश, १९८४. (केंद्र शासन)**

हा आदेश आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये असलेल्या अधिकारानुसार काढण्यात आलेला आहे. राज्य शासनाने आदेशातील तरतुदीनुसार नोंदणी केल्याशिवाय १,००० किलो किंवा त्यापेक्षा जास्त चहाचा साठा बाळगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस व्यापारी म्हणून धंदा करता येणार नाही, तसेच या आदेशान्वये प्रत्येक व्यापाऱ्यास १,००० किलो पेक्षा जास्त असलेला चहाचा साठा राज्य शासनाचे नियुक्त अधिकाऱ्यास पाक्षीक अहवालाने जाहीर करणे आवश्यक आहे.

**४०. महाराष्ट्र चहा व्यापारी (व्यापारांची नोंदणी व साठे जाहीर करणे) आदेश, १९८४. (राज्य शासन)**

हा आदेश आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये काढण्यात आला आहे. या आदेशान्वये कोणीही व्यक्ती सर्व प्रकारचा मिळून एकूण चहाचा १००० किलो किंवा त्यापेक्षा जास्त साठा बाळगत असल्यास व त्या व्यक्तिस चहाचा व्यापार करावयाचा असेल तर, त्या व्यक्तिने या आदेशातील तरतुदीनुसार नोंदणी करणे आवश्यक आहे. या आदेशात नोंदणी संबंधिचे पध्दत तद्संबंधिच्या इतर बाबींचा समावेश आहे.

# परिशिष्ट ''ई''

जिल्हावार शिधापत्रिकांची संख्या (दिनांक ३१ डिसेंबर २०१९ रोजी)

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | एपीएल शिधापत्रिका | एएवाय (२) शिधापत्रिका | पीएचएच (३१) शिधापत्रिका | एकूण शिधापत्रिका | कार्यरत रास्तभाव दुकानांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | फ परिमंडळ ठाणे. . . | ... | १३०५९ | ७२३७३५ | ७३६७९४ | १४४० |
| २. | ड परिमंडळ अंधेरी. . . | ... | ३९२ | २२६८७२ | २२७२६४ | ५३१ |
| ३. | ई परिमंडळ वडाळा. . . | ... | २६७८ | ५२९४४६ | ५३२१२४ | १०३४ |
| ४. | ग परिमंडळ कांदीवली | ... | १९४३ | २८२४७३ | २८४४१६ | ६९४ |
| ५. | अ परिमंडळ परेल. . . | ... | १३४७ | १६१६२८ | १६२९७५ | ५७३ |
| ६. | ठाणे . . . | ... | ४६९८५ | १००४२३ | १४७४०८ | ५९२ |
| ७. | पालघर . . . | ... | ८९३८३ | २९३३९४ | ३८२७७७ | १०७७ |
| ८. | रायगड . . . | ... | ८३४३१ | ३३४२६६ | ४१७६९७ | १३६१ |
| ९. | रत्नागिरी . . . | ... | ४०१४५ | २४१३०८ | २८१४५३ | ९४३ |
| १०. | सिंधुदूर्ग . . . | ... | २४२३९ | १५३७६३ | १७८००२ | ४३२ |
| ११. | नाशिक . . . | ... | १७३८६२ | ५८५८०३ | ७५९६६५ | २६०८ |
| १२. | जळगाव . . . | ... | १३२३३८ | ४६९९७८ | ६०२३२६ | १९३२ |
| १३. | धुळे . . . | ... | ७६३९८ | २२१३८४ | २९७७८२ | ९८० |
| १४. | नंदुरबार . . . | ... | १००४३२ | १५९९०५ | २६०३३७ | १०६१ |
| १५. | पुणे (ग्रामीण) . . . | ... | ४७१४२ | ४९४९६६ | ५४२१०८ | १८१४ |
| १६. | पुणे (शहर) . . . | ... | ८७५९ | २९५४८१ | ३०४२४० | ७६८ |
| १७. | सातारा . . . | ... | २८२८९ | ३७०४७६ | ३९८७६८ | १६८० |
| १८. | कोल्हापूर . . . | ... | ५३२४२ | ५०२७०३ | ५५५९४५ | १५९५ |
| १९. | सांगली . . . | ... | ३०४९८ | ३५२९६८ | ३८३४६६ | १३५६ |
| २०. | सोलापूर (ग्रामीण). . . | ... | ५६५५९ | ३५३२९६ | ४०९८५५ | १५५८ |
| २१. | सोलापूर (शहर) . . . | ... | ६०४३ | ८८९८२ | ९५०२५ | ३१४ |
| २२. | औरंगाबाद . . . | ७८५९९ | ६६१३५ | ४०४४०९ | ५४९१४३ | १८०२ |
| २३. | जालना . . . | ३०८३५ | ४४२४३ | २७१६७५ | ३४६७५३ | १२८० |
| २४. | परभणी . . . | ५६०२५ | ४३८१० | २०४९३९ | ३०४७७८ | ११८३ |
| २५. | हिंगोली . . . | ३७८३५ | २९८३८ | १४९०५६ | २१६७२९ | ७९६ |
| २६. | नांदेड . . . | ९६६५४ | ७९६०२ | ४०७०९७ | ५८३३५३ | १९९६ |
| २७. | लातूर . . . | ६१४३२ | ४१९२३ | ३०१६८२ | ४०५०३७ | १३५० |
| २८. | बीड . . . | ११९०५१ | ३६५८७ | ३३५३२४ | ४९०९०२ | १९६२ |
| २९. | उस्मानाबाद . . . | ५२११८ | ३८२८६ | २०३७२७ | २९४१३१ | १०७२ |
| ३०. | अमरावती . . . | ११४४८८ | १२३८७४ | २८६५८६ | ५२४९४८ | १९१३ |
| ३१. | अकोला . . . | ४६४०८ | ४३३८६ | २१७७०१ | ३०७४९५ | १०६१ |
| ३२. | वाशिम . . . | २५५१८ | ४७९९४ | १७४४५८ | २४७९७० | ७७५ |
| ३३. | यवतमाळ . . . | ८७२६० | १३००८७ | ३४२०४४ | ५५९३९१ | २०३८ |
| ३४. | बुलढाणा . . . | ८६४०१ | ६५४९९ | ३२९९६३ | ४८१८६३ | १५३६ |
| ३५. | नागपूर (ग्रामीण) . . . | ... | ७७२३८ | २९६२४८ | ३७३४८६ | १२८८ |
| ३६. | नागपूर (शहर) . . . | ... | ४३८३४ | ३०४७६७ | ३४८६०२ | ६८२ |
| ३७. | वर्धा . . . | २४१४७ | ४६४०९ | १९२३७१ | २६२९२७ | ८४९ |
| ३८. | भंडारा . . . | ... | ६५१६५ | १६०२२१ | २२५३८७ | ८८८ |
| ३९. | गोंदिया . . . | ... | ७८४१४ | १३८३३३ | २१६७५१ | ९९८ |
| ४०. | चंद्रपूर . . . | ... | १३७०२३ | २५४३६५ | ३९१३८८ | १५३३ |
| ४१. | गडचिरोली . . . | ... | ९८०६३ | १०५९१२ | २०३९७५ | ११९६ |
| | एकूण. . . | ९१६७७५ | २४४२०९९ | १२६०८६६२ | १५९६७५५४ | ५२४२४ |

## परिशिष्ट " फ "

**परिच्छेद ४.४ पहावा**

**वैधमापनशास्त्र यंत्रणेच्या कामाचा आढावा दर्शविणारा तक्ता**

**वजने मापे पडताळणी व मुद्रांकन कामाचा तपशील**

| अनु-क्रमांक | चालू वार्षिक कार्यक्रम | पडताळणी व मुद्रांकन फी वसुली रुपये (लाखात) | राज्यांतर्गत आवेष्टित वस्तूंचे उत्पादक/आवेष्टक यांची नोंदणी | नोंदणी शुल्क रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | चालू वार्षिक कार्यक्रमान्वये गाठावयाचे लक्ष्य—२०२१—२०२२ | ७७७९.८६ | ... | ... |
| २. | चालू वार्षिक कालावधीतील राहिलेले कार्य दि. १-०४-२०२१ ते दि. ३१-०३-२०२२ पर्यंत. | ... | ... | ... |
| ३. | ऑक्टोबर २०२१ पर्यंत या कालावधीत गाठावयाचे अंदाजे लक्ष्य. | ४५३२.४१<br>साध्य—३९४९.२७ | ... | ... |
| ४. | मागील वार्षिक कालावधीत केलेले कार्य. | | | |
| | वर्ष २०१५-२०१६ | ४२८२.०९ | ५३८ | २८३१०० |
| | वर्ष २०१६-२०१७ | ४०३०.३२ | १९४ | ५६०५०० |
| | वर्ष २०१७-२०१८ | ४२९५.४७ | २१२ | ६१०१०० |
| | वर्ष २०१८-२०१९ | ७४०५.३७ | ६६३ | ३९७५०० |
| | वर्ष २०१९-२०२० | ७६३७.५७ | ४६१ | २३०५०० |
| | वर्ष २०२०-२०२१ | ७७६९.८६ | ३६४ | १८२५०० |

# परिशिष्ट ''ग''

[परिच्छेद ४.४ पहावा]

## खटले भरण्यात आलेली प्रकरणे दाखविणारा तक्ता

| | (प्रत्यक्षातील आकडेवारी) वर्ष २०१८–२०१९ | | (प्रत्यक्षातील आकडेवारी) वर्ष २०१९-२०२० | | (प्रत्यक्षातील आकडेवारी) वर्ष २०२०-२०२१ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ | आवेष्टित वस्तू नियम, २०११ व वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ मधील | वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ | आवेष्टित वस्तू नियम, २०११ व वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ मधील | वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ | आवेष्टित वस्तू नियम, २०११ व वैध मापने शास्त्र अधिनियम, २००९ मधील |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| (१) **संपूर्ण वर्षात उघडकीस आलेले गुन्हे.** | ७५५४ | ४४५४ | ६१६७ | ४१०० | ११११ | ... |
| (२) **वर्षारंभी प्रलंबित असलेली प्रकरणे.** | १८७८५ | ४१५६ | ११८७६ | २६३६ | ४८९९ | ... |
| (३) **निकालात काढावयाची एकूण प्रकरणे.** | २६३३९ | ८६१० | १८०४३ | ६७३६ | १४०४ | ... |
| (४) **निकाली प्रकरणांचा तपशील :—** | | | | | | |
| (अ) (१) विभागाकडून (खात्यामार्फत) सामोपचाराने मिटविण्यात आलेली प्रकरणे. | ६४८१ | ४०२२ | ५६४९ | २५३६ | ३२६२ | ... |
| (२) प्रशमन वसुली रक्कम (रुपये) | ८४८९७१० | ७७६५४४०० | ७८८८५०० | ५१५५९१०० | ३५३९१७५ | ... |
| (ब) कोर्टाने निर्णय दिलेली प्रकरणे :— | | | | | | |
| (१) शिक्षा दिलेले | १०९ | ६२२ | ७ | १३७ | २६ | ... |
| (२) निर्दोष सुटलेले | २५४ | ८२५ | ३३ | ... | २ | ... |
| (५) **वर्षाचे शेवटी प्रलंबित असलेली एकूण प्रकरणे.** | ४३३८ | १८४०० | ४८१४ | २०२४९ | २७७२ | ... |

# परिशिष्ट-''ह''

[परिच्छेद ४.४ पहावा]

## मागील तीन कॅलेंडर वर्षातील नवीन नुतनीकरण करण्यात आलेल्या परवान्यांबाबत तक्ता

| वर्गवारी | प्रत्यक्षात वर्ष २०१९ संख्या | प्रत्यक्षात वर्ष २०२० संख्या | प्रत्यक्षात वर्ष २०२१ संख्या |
|---|---|---|---|
| (१) **उत्पादक—** | | | |
| (अ) नवीन | १७ | १५ | ... |
| (ब) नुतनीकरण केलेले | ६१ | १३४ | ... |
| (क) प्राप्त झालेली रक्कम (रुपये) | १८,६०,००० | १४,९०,००० | ... |
| (२) **विक्रेता—** | | | |
| (अ) नवीन | ११ | १४१ | ... |
| (ब) नुतनीकरण केलेले | ५१ | २७७ | ... |
| (क) प्राप्त झालेली रक्कम (रुपये) | ३,०५,००० | ८,३६,००० | ... |
| (३) **दुरुस्तक—** | | | |
| (अ) नवीन | २० | ३८ | ... |
| (ब) नुतनीकरण केलेले | ५० | ३६६ | ... |
| (क) प्राप्त झालेली रक्कम (रुपये) | ५,४०,००० | १६,१६,००० | ... |
| (ड) विलंब शुल्क (रुपये) | ... | ... | ... |
| (ई) प्रतिभूती ठेव (रुपये) | १,९०,००० | २,९०,००० | ... |

**मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय**
**वर्धा रोड, नागपूर ४४० ०२०**

मकामुना (एच-१०७३)—६-२०२४—३० पानी—५००पु.—पीए४*